Library

किंमत - वार्षिक वर्गणी १००/- रुपये

# अर्थबोधपत्रिका

आपल्या आजूबाजूस घडणाऱ्या विविध घटनांचा
'अर्थ'बोध करून देणारे मासिक

३ ● संवाद
५ ● राजकीय भोवऱ्यात इराण
१३ ● इंडोनेशियात 'सॉफ्ट इस्लाम'!
१७ ● कसे असेल उद्याचे शहरी जग...?
२३ ● आव्हान, ग्रामीण रोजगाराचे...
२७ ● चीनचा व्यापारी ठसा
३१ ● जिकडेतिकडे
(दिग्गज तेल कंपन्यांना आव्हान)
३३ ● आढावा

खंड ७ : अंक १ एप्रिल २००८

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

**वार्षिक वर्गणी १००/- रुपये**

**(परदेशस्थ वाचकांसाठी $२०)**

वर्गणी डिमांड ड्राफ्ट/ मनीऑर्डर/ पोस्टल ऑर्डर/चेकने किंवा रोख **'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी'** या नावे पाठवावी. त्याबरोबर **नाव व संपूर्ण पत्ता पिनकोडसह कळवावा.**

**'अर्थबोधपत्रिका' दर महिन्याच्या १० तारखेला पोस्टाने पाठविली जाते.**


**वर्गणीसाठी पत्ता :**

**व्यवस्थापक, अर्थबोधपत्रिका,**

**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी,** अर्थबोध, ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, (रत्ना हॉस्पिटलजवळ) पुणे ४११ ०१६.

फोन : २५६५७१३२, २५६५७२१०

फॅक्स : २५६५७६९७

ई-मेल: ispe@vsnl.net, ispe@vsnl.com



**अर्थबोधपत्रिका**

**खंड ७ (अंक १) एप्रिल २००८**

**संपादक - अभय टिळक**

**साहाय्यक संपादक - राज्यश्री क्षीरसागर**


### *'अर्थबोधपत्रिके'तील माहिती कशी?*

- उद्‌बोधक, वाचनीय आणि रंजक
- अभ्यासपूर्ण आणि विश्लेषक
- नि:पक्ष व साधार
- सोप्या भाषेतील आणि विचारप्रवर्तक
- हाताशी असणाऱ्या मोजक्याच वेळात जगाबद्दलचे भान वाढविणारी

### *'अर्थबोधपत्रिके'चा हेतू*

प्रतिष्ठित व अग्रगण्य नियतकालिके, पुस्तके आणि इंटरनेटसारख्या माध्यमांद्वारे राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर, मुख्यत: इंग्रजी भाषेत प्रकाशित होणारी जी माहिती मराठी वाचकांपर्यंत सहजतेने पोचत नाही, अशी वेचक माहिती संदर्भासह पुरविणे.

### *'अर्थबोधपत्रिका'कशी साकारते?*

- मूळ इंग्रजी संदर्भाचा शोध व वाचन
- निवडक साहित्याचे संकलन
- संकलित साहित्याला अन्य पूरक माहितीची जोड
- संकलित माहितीच्या आधारे नव्याने लेखन. मूळ इंग्रजी संदर्भाचा केवळ अनुवाद नव्हे.

- या अंकातील मजकुराबाबत आपण आपल्या सूचना आणि/किंवा अभिप्राय संपादकांच्या नावे संस्थेच्या पत्त्यावर पाठवावेत, ही विनंती.
- अंकातील लेख आपण नियतकालिकात/वृत्तपत्रात प्रसिद्ध करू शकता. मात्र, लेख प्रसिद्ध केल्यावर त्याखाली **'अर्थबोधपत्रिका, भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीच्या सौजन्याने'** अशी ओळ प्रसिद्ध करावी एवढीच अपेक्षा आहे.**यासाठी संस्थेतर्फे मूल्य आकारण्यात येणार नाही. मात्र लेख प्रसिद्ध केलेला अंक संस्थेला अवश्य पाठवावा.**

जनतेत क्षोभ उत्पन्न करण्यापेक्षा तिच्यात विचार उत्पन्न करणे हे कितीतरी महत्त्वाचे आणि कठीण कार्य आहे - तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी

# संवाद

'अर्थबोधपत्रिके'चा प्रत्येक नवीन अंक आपल्यासारख्या सुजाण आणि विचक्षण वाचकांसमोर सादर करीत असतानाची मनःस्थिती मोठी मजेशीरच असते. एका अंकाचे काम नियोजित वेळापत्रकानुसार पार पडले एकदाचे, असा सुस्कारा सोडत असतानाच मनाच्या कोठल्या तरी कोपऱ्यात पुढील अंकाच्या भालदार-चोपदारांची पावले प्रवेशत असल्याची जाणीव जागी व्हायला लागलेली असते. हातावेगळ्या झालेल्या अंकाद्वारे वाचकांच्या अपेक्षांची पूर्तता कितपत होईल, याचा उत्कंठापूर्ण तणाव तर असतोच, पण त्याच वेळी दुसरीकडे, आता नवीन अंकासाठी काय शोधायचे-धुंडाळायचे याची एक अधीर विवंचनाही असते. मुळात, 'पत्रिके'चे वाचक हे बव्हंशी 'पत्रिके'वर अव्यक्त प्रेम करणारे असेच आहेत. 'वाचकांच्या प्रतिसादा'ची जागा संपादकीयाने व्यापलेली दिसताच आपल्याला त्याची कल्पना येत असणारच ! परिणामी, वाचकांना काय आवडेल याचे काही अंदाज बांधतच मजकुराची जुळवाजुळव गती घेते. या अंदाजाला आशंकेचे अस्तरही असते. हा सारा तणाव, हुरहूर, टोचणी 'पत्रिके'च्या स्वरूपाशी जणू अभिन्नपणे गुंफलेलीच आहे. लेखन-प्रकाशन-वाचनविश्वात ही जणू नित्याचीच बाब असली तरी, 'अर्थबोधपत्रिके'च्याबाबतीत मात्र तिची सघनता अंमळ अधिकच आहे. यास मुख्यत्वाने कारण आहे ते 'पत्रिके'चे स्वरूप. 'अर्थबोधपत्रिका' ही मतपत्रिका नव्हे तर माहितीपत्रिका आहे. तिच्या नावात 'अर्थबोध' हा जो शब्द आहे त्याची तिथे योजना एका विशिष्ट हेतूने करण्यात आलेली आहे. 'अर्थबोधपत्रिके'च्या प्रत्येक अंकाच्या अंतरंगातील विविध विषयांचा अर्थबोध वाचकांना आयताच 'घडवून' देण्याचे उद्दिष्ट इथे मुदलातच नाही. उलट, भवताली साकारणाऱ्या नानाविध घटितांचा अर्थ समजावून घेत त्याद्वारे समाजजीवनाच्या विविधांगांतील व्यवहारांचा, त्यांमागील कार्यकारणभावाचा बोध स्वतःच स्वतःला घडविण्यास साहाय्यभूत अशी विश्वसनीय, साधार, परिष्कृत आणि निःपक्ष माहिती वाचकांना उपलब्ध करून देणे, हा 'पत्रिके'चा आद्य आणि प्रधान हेतू आहे. परंतु, याचा अर्थ हे काम निव्वळ वाढप्याचे आहे, असे मात्र मुळीच नाही. इथे, आचारी आणि

वाढण्याचे अद्वैत आहे. बरे, जो वाचनभोज सिद्ध करावयाचा तोही असा की त्यात रुची, नाविन्य आणि ताजेपणा यांचा समसमा संयोग हवा. वर्तमानातील घटनांचा वेध तर घ्यावयाचा पण वर्तमानपत्रांमध्ये त्या त्या घटनांबाबत जे जे काही येऊन गेलेले आहे, त्यापेक्षा वेगळे आणि आस्वाद्य असे काही तरी तयार करून पानात वाढावयाचे, ही खरी कसोटी असते. वर्तमानाला आकार देणाऱ्या भूतकालाचा वेध घ्यावयाचा, कार्यकारणभावाचे पदर-उपपदर उलगडून बघावयाचे, त्या पापुद्र्यांचे अंतःसंबंध विलग करण्याचा प्रयत्न करावयाचा आणि हे सारे साधण्याची खटपट करत असतानाच त्यात कोठेही व्यक्तिगत मत वा भूमिका न मांडता निखळ माहितीचे सादरीकरण करावयाचे, म्हणजे जणू तारेवरची कसरतच ! मात्र, या सगळ्या कसरतीतही एक निखळ आनंद असतो. 'पत्रिके'वरील वाचकांच्या प्रेमामुळे हा आनंद दुणावतो. वाचकांच्या प्रेमाचे हे पाथेय बरोबर घेऊनच 'अर्थबोधपत्रिका' सातव्या खंडात प्रवेशते आहे. ✿✿

## वाचकांचा प्रतिसाद

मी आपल्या 'अर्थबोधपत्रिके'चा सभासद आणि नियमित वाचक आहे. मला ही 'पत्रिका' सर्वार्थाने आवडते कारण तिच्यामध्ये भरपूर वैचारिक खाद्य आणि ज्ञानसंवर्धक माहिती असते.

**पु. रा. रामदासी, पुणे**

### निवेदन


- ज्या देश, प्रदेश, संस्था अथवा व्यक्तिनामांच्या इंग्रजी स्पेलिंगनुसारी अचुक मराठी उच्चारांसंदर्भात संदिग्धता जाणवते अशी नामे लेखांमध्ये देवनागरीत उद्धृत करण्याऐवजी रोमन लिपीमध्ये इंग्रजीतच दिलेली आहेत.
- लेखांमधील संदर्भांसाठी विश्वसनीय, अधिकृत अशा साइट्सच धुंडाळण्याचा कटाक्ष ठेवला जातो. तरीही, इंटरनेटवरून घेतलेल्या तपशीलाच्या यथार्थतेबाबत भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी हमी देऊ शकणार नाही. अशा मजकुराची जबाबदारीही संस्थेवर नाही, याची वाचकांनी कृपया नोंद घ्यावी.

# राजकीय भोवऱ्यात इराण

तेलाच्या साठ्यांमुळे मध्य आशियातील घडामोडी या जागतिक राजकारणात नेहमीच महत्त्वाच्या ठरत आलेल्या आहेत. अलीकडे, इराणची आक्रमक भूमिका हा जागतिक राजकारणात चर्चिला जाणारा महत्त्वाचा विषय ठरला आहे. अमेरिका इराणवर हल्ला करणार का, येथपर्यंत ही चर्चा पोहचली आहे. त्यातच इराणची वाटचाल लोकशाहीच्या दिशेने व्हावी यासाठी अमेरिकेने लाखो डॉलरचा निधी उपलब्ध करून देण्याचे ठरविले आहे. इराण गुप्तपणे आपला आण्विक कार्यक्रम पुढे रेटीत आहे, इराकसंदर्भातही त्याने कडक भूमिका घेतली आहे आणि दहशतवादाला इराण पाठिंबा देत आहे, अशी कठोर टीका आंतरराष्ट्रीय समुदायाकडून इराणवर करण्यात आली आहे. तर, देशाची सुरक्षा व स्थैर्य याला आपण प्राधान्य देत असल्याची इराणची भूमिका आहे. सुमारे एक दशकापूर्वी, म्हणजे १९९७मध्ये, मोहम्मद खातामी यांच्या कारकीर्दीत सुधारणांच्या दिशेने पावले टाकणारा आणि आंतरराष्ट्रीय राजकारणात अमेरिका व युरोपीय राष्ट्रांबरोबर मैत्रीचा हात पुढे करणारा इराण आता कट्टरतेकडे आणि आक्रमकतेकडे का झुकला आहे ? तेथे पुराणमतवाद्यांचा प्रभाव का वाढला आहे ? तेथील समाजजीवनांत याचे परिणाम काय होत आहेत ?

'इस्लामिक रिपब्लिक ऑफ इराण' हे नाव धारण करणाऱ्या या कट्टर मुस्लिम राष्ट्रात धर्माधिष्ठित लोकशाहीचा वेगळा प्रयोग करण्यात आला आहे. म्हणजे तेथे सर्वोच्च धार्मिक नेते (विद्यमान अयातोल्ला अली खामेनी) आणि त्यांनी नियुक्त केलेले न्यायमंडळाचे प्रमुख आणि लोकशाही मार्गाने निवडून आलेले सरकार या सर्वांच्या माध्यमातून देशाचा कारभार चालतो. गेल्या दशकात इराणचे राजकारण लोकनियुक्त संस्था आणि लोकनियुक्त नसलेल्या संस्था यांच्यात उडणाऱ्या खटक्यांभोवतीच फिरले. १९९७मध्ये सुधारणावादी अध्यक्ष मोहम्मद खातामी यांच्या बाजूने इराणी जनतेने कौल दिला. आंतरराष्ट्रीय पातळीवर याचे स्वागत झाले. इराणमध्ये राजकीय व आर्थिक सुधारणा घडून येण्याची अपेक्षा करण्यात आली. खातामी यांनी सुधारणांच्या दिशेने जाण्याचा प्रयत्न केला. पण सुधारणा मान्य नसणारा, कट्टरतेकडे झुकणारा गट मात्र तेव्हा अस्वस्थ झाला होता. सुधारणांमुळे इराणमध्ये धर्माचे स्थान

# इराणची सत्तासूत्रे (तक्ता)




डळमळीत होईल, अशी शंका त्यांना वाटत होती. या गटाच्या विरोधामुळे सुधारणा राबविण्यात खातामी फारसे यशस्वी झाले नाहीत. याच काळात कट्टरतेकडे झुकलेला गट राजकारणात अधिकच सक्रिय झाला.

दरम्यान बुश प्रशासनाने इराणच्या आण्विक कार्यक्रमाबाबत विरोधी भूमिका घेतल्याने कट्टरधर्मीय गट अधिक आक्रमक बनला. या नंतर २००५मध्ये झालेल्या निवडणुकीत कट्टर गटाचे नेते महमूद अहमदीनेजद यांच्या हाती सत्ता आली. त्यांनी उघडपणे अमेरिकाविरोधी भूमिका घेतली. त्यांच्या काळात इराण धर्माकडे अधिकच झुकला. त्यामुळे खातामी यांच्या काळात इराणचे परराष्ट्रविषयक सहकार्याचे असलेले धोरण बासनात गुंडाळले जाऊन त्याची जागा संघर्षात्मक धोरणाने घेतली. आंतरराष्ट्रीय पटलावर अशा घटना घडत असतानाच अहमदीनेजद यांच्या सरकारला देशांतर्गत विरोधही होऊ लागला आहे. या सरकारने सुधारणावादी भूमिका तर घेतली नाहीच, उलट नागरिकांचा आवाज दडपण्याचाच प्रयत्न केला. स्त्रियांच्या पोशाखावर बंधने घातली. प्रसारमाध्यमांवर नियंत्रण ठेवले. त्यामुळे लोकशाहीच्या दिशेने जाण्याच्या प्रयत्नात असलेल्या गटाची गळचेपी होऊ लागली. सध्याच्या कट्टरपंथीय सरकारला

देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय पातळीवर बराच विरोध होत असला तरी सरकार व धार्मिक नेते आपल्या भूमिकेवर ठाम आहेत. इराणचे सर्वोच्च धार्मिक नेते अयातोल्ला खामेनी यांनी अलीकडेच शत्रूला (बहुधा अमेरिका आणि सुधारणावादी गट) कधीही घाबरू नये वा त्याला कमी समजू नये, आपले आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्र शत्रूच्या तावडीत सापडणार नाही यासाठी काळजीपूर्वक पावले उचलणे यातच शहाणपणा आहे, अशा आशयाचे वक्तव्य केले. म्हणजे इराण अधिक कट्टर बनतो आहे, हे यातून सूचित होते. त्यामुळे इराण दुसऱ्या 'इस्लामिक क्रांती'च्या दिशेने पावले टाकत असल्याचे मत काही अभ्यासक मांडतात (१९७९मध्ये झालेल्या 'इराणी क्रांती'ला 'इस्लामिक क्रांती' म्हटले जाते. रेझा शाह पहलवी यांची कथित भ्रष्ट कारकीर्द संपुष्टात आणण्यासाठी तेथे ही क्रांती झाली). कट्टरपंथीय सरकारच्या आक्रमक भूमिकेचे चटके अभ्यासक, विद्यार्थी, कामगार व महिला अशा सर्वांना काही प्रमाणात बसले आहेत. सरकारच्या दडपशाहीला त्यांना सामोरे जावे लागले आहे. मोहम्मद खातामींच्या काळात इराणमध्ये सुधारणांची दारे उघडण्याचा प्रयत्न झाला होता. आता ही दारे पूर्णपणे बंद झाली आहेत. तर दुसरीकडे, आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय पातळीवर इराणबाबत काही मुद्दे चर्चिले जात आहेत.

## इराण-अमेरिका संबंध

आंतरराष्ट्रीय पातळीवर इराणबाबत अलीकडे सर्वांत जास्त प्रमाणावर चर्चिला जाणारा मुद्दा म्हणजे इराण-अमेरिका संबंध हा होय. उभयपक्षी संबंध अलीकडे फारच ताणले गेलेले दिसत असले तरी वस्तुतः ते गेल्या २८ वर्षांपासून म्हणजे इस्लामिक राज्यक्रांतीच्या काळापासूनच ताणलेलेच आहेत. इराण 'इस्लामिक रिपब्लिक' असल्याने ११ सप्टेंबरच्या घटनेनंतर उभयपक्षी वितुष्ट अधिकच वाढले. 'अमेरिकेच्या हितसंबंधांना बाधा आणणारा आखातातील एक इस्लामिक देश' या दृष्टिकोणातून अमेरिकेने इराणचा विचार केला. तर आंतरराष्ट्रीय पातळीवर आणि देशांतर्गत संघर्ष निर्माण करणारा देश या चष्म्यातून इराणने अमेरिकेकडे पाहिले. इराणचा आण्विक कार्यक्रम, इराक-अमेरिका आणि अफगाणिस्तान-अमेरिका संबंध इत्यादींचा विचार करून अमेरिकेने इराणवर निर्बंध लादले. इराणबरोबरचे राजकीय संबंध संपुष्टात आणण्यासाठी संयुक्त राष्ट्रसंघात ठराव आणण्याच्या अमेरिकेच्या प्रयत्नांना चीन आणि रशियाने मान्यता दिलेली नाही. इराणमधील Islamic Revolutionary Guard Corps (IRGC) दहशतवादाला पाठिंबा देत आहे असे अमेरिकेचे म्हणणे असून त्यांच्यावरही निर्बंध घालण्यात यावे,

अशी अमेरिकेची भूमिका आहे. IRGCला दहशतवादी संघटना घोषित करावे असा ठराव अमेरिकेच्या सिनेटने अलीकडेच मंजूर केला आहे. इराणचे लष्कर सर्वोच्च धार्मिक नेते अयातोल्ला खामेनी यांच्या नियंत्रणाखाली असून विद्यमान अध्यक्ष अहमदीनेजद IRGCमध्ये अधिकारपदी होते, हे येथे लक्षात घेतले पाहिजे.

इराणमध्ये २००९मध्ये निवडणुका होणार असून त्या वेळी कट्टरपंथीय गट सत्तेवर येऊ नये यासाठी अमेरिका प्रयत्नशील आहे. म्हणून तेथील लोकशाही समर्थक गटांच्या व इतर नागरी संघटनांमार्फत अमेरिका लोकशाहीची तत्त्वे रुजविण्यासाठी भरघोस अर्थसाहाय्य करीत आहे. यासाठी अमेरिकेने २००७मध्ये ७ कोटी ५० हजार अमेरिकी डॉलर आणि २००८मध्ये १० कोटी ९० लाख अमेरिकी डॉलर इतका निधी उपलब्ध करून दिला आहे. अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि महिलांचे अधिकार हे विषय तेथे लावून धरण्याचा प्रयत्न अमेरिकेने चालविला आहे. इराणमधील प्रसारमाध्यमांवर कट्टरपंथीयांचे नियंत्रण असून लोकशाहीसमर्थक लेखकांचे लेख तेथे प्रसिद्ध करण्यात येत नाहीत. या शिवाय इराकमधील अमेरिकी सैन्यदेखील इराणच्या चारही बाजूंना तळ ठोकून सज्ज आहे. अशा परिस्थितीत इराणने देशाच्या सुरक्षिततेला प्राधान्य देऊन युद्धाला सामोरे जाण्याची तयारी ठेवली असणे स्वाभाविक आहे.

**सत्ता टिकविण्यासाठी...**

आखातात इराणला आपले स्थान बळकट करायचे आहे. इराणने इराकमधील दहशतवादी संघटनेला मदत केली असल्याची टीका करण्यात येऊनही इराकमध्ये हस्तक्षेप करण्याचे आपले धोरण इराणने बदललेले नाही. इराकमध्ये आपला जम बसविण्यासाठी इराण हरप्रकारचे प्रयत्न करीत आहे. इराकमधील विद्यमान संयुक्त सरकारमध्ये 'सुप्रीम इस्लामिक इराकी कौन्सिल' हा सर्वांत मोठा पक्ष आहे. याचे नाव पूर्वी 'सुप्रीम कौन्सिल फॉर द इस्लामिक रिव्होल्यूशन इन् इराक' असे होते. सद्दाम हुसेन सत्तारूढ असताना या पक्षाच्या नेत्यांनी इराणमध्ये आश्रय घेतला होता. इराणमधील IRGCने इराकमधील Badr नामक गटालाही लष्करी प्रशिक्षण दिले होते. १९८०मध्ये झालेल्या इराण-इराक युद्धात हा गट इराणच्या बाजूने सहभागी झाला होता.Islamic Dawa Partyने आणि Patriotic Union of Kurdistanनेदेखील इराणच्या सरकारबरोबर चांगले संबंध प्रस्थापित केलेले आहेत. इराकच्या सत्तारूढ पक्षांबरोबर इराणचे सहकार्याचे धोरण असल्याने अमेरिकेच्या इराकमधील वर्चस्वाला आपोआपच लगाम बसला आहे. दरम्यान, इराणने आपल्या लष्करातही काही महत्त्वाचे फेरबदल

केले आहेत. अमेरिकेबरोबरचे ताणलेले संबंध लक्षात घेऊन जर अमेरिकेने इराणवर हल्ला केला वा मध्यपूर्वेत आणखी काही घडामोडी घडल्या तर त्याची पूर्वतयारी म्हणून हे बदल करण्यात आले असावेत, असे मत निरीक्षक मांडतात. या शिवाय आण्विक कार्यक्रमांबाबतही इराणने कडक भूमिका घेतली आहे. इराणचा आण्विक कार्यक्रम शांततेसाठीच आहे, असे अध्यक्ष अहमदीनेजद यांनी स्पष्ट केले असून यावर चर्चा करण्याचा प्रश्नच नाही, असेही ठामपणे म्हटले आहे. इराणमधील धार्मिक गटाने या मुद्याच्या आधारे राष्ट्रवादाची भूमिका घेतली आहे. १९५०मध्ये तेल कंपन्यांचे राष्ट्रीयीकरण करताना तत्कालीन पंतप्रधान मोहम्मद मोसेदेघ यांनी राष्ट्रवादाचीच भूमिका पुढे आणली होती. आपले सरकार वाचविण्यासाठी इराणमधील नेते आण्विक कार्यक्रमाचा मुद्दा पुढे रेटत आहेत, असेही म्हटले जात आहे.

## अंतर्गत दडपशाही

इराणमध्ये धर्माधिष्ठित लोकशाही आहे; मात्र तेथे संपूर्णपणे धर्मनिरपेक्ष लोकशाही असावी असे अमेरिकला वाटते. त्यामुळे अशी लोकशाही प्रस्थापित करण्यासाठी अमेरिका तेथील नागरी संघटनांमार्फत प्रयत्न करीत आहे. मात्र प्रत्यक्षात याचा परिणाम उलटाच होताना दिसतो. म्हणजे, इराणमध्ये अमेरिकेचा हस्तक्षेप वाढतो आहे, असे म्हणून इराणचे सरकार लोकशाही समर्थकांचा आवाज दडपत आहे. त्यामुळे तेथे अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर गदा येते आहे. सार्वजनिक सुरक्षा, चलनवाढ, तेलाच्या वाढणाऱ्या किंमती, नागरी संस्था आणि इराण-अमेरिका इत्यादी विषयांवर प्रसारमाध्यमांमधून मत मांडणे वा चर्चा घडवून आणण्यावर बंदी आहे. सुधारणावादी वृत्तपत्रे आणि वेबसाइट्स् बंद करण्यात आल्या आहेत. अमेरिकेत वास्तव्यास असणाऱ्या, अमेरिकेतील 'थिंक टँक' बरोबर सहकार्य करणाऱ्या इराणी नागरिकांची ते कारणपरत्वे मायदेशी येताच धरपकड चालू आहे. विद्यार्थी, पत्रकार, अभ्यासक, स्त्री-हक्क कार्यकर्त्या आणि कामगारनेते अशा अनेक जणांना या दडपशाहीला सामोरे जावे लागले आहे.

विचारवंत आणि सरकारी सेवेतील अधिकारीही यातून सुटलेले नाहीत. सुधारणावादी अध्यक्ष मोहम्मद खातामी यांच्या काळात युरोपीय देशांबरोबर आण्विक कार्यक्रमाबाबत चर्चा घडवून आणणारे उच्चपदस्थ हुसेन मोसेवियान यांनाही देशद्रोहाच्या आरोपाखाली अटक करण्यात आली आहे. इराणमध्ये लोकशाही प्रस्थापित करण्यासाठी अमेरिका आर्थिक साहाय्य करीत असून अशा नागरिकांद्वारे इराणमध्ये 'सॉफ्ट रिव्होल्यूशन' (याला 'मखमली क्रांती' असेही संबोधण्यात आले आहे) घडवून आणण्याचा प्रयत्न

करण्यात येत आहे, असे सरकारी सूत्रांनी म्हटले आहे. राजकीय दडपशाहीबरोबर नैतिकतेचा मुद्दाही उपस्थित करण्यात येत आहे. सर्वसामान्य नागरिकांनी इस्लामचे कठोर पालन करावे, स्त्रियांनी आपल्या पोशाखाकडे विशेष लक्ष द्यावे, हिजाब बांधावा, पुरुषांनी आखूड बाह्यांचे शर्ट घालू नयेत आणि केशभूषेची योग्य काळजी घ्यावी असे सरकारने स्पष्ट केले आहे. अनैतिक वर्तनाचा मुद्दा उपस्थित करून सुमारे दीड लाख नागरिकांना प्रशासनाने तात्पुरत्या कैदेतही डांबले होते. अंतर्गत सुरक्षेचा मुद्दा उपस्थित करून सरकार अनेकांना अटक करीत आहे. खून, बलात्कार, अंमली पदार्थांचा चोरटा व्यापार इत्यादी कारणांवरून अनेकांना फासावरही चढविण्यात आले आहे.

**अल्पसंख्याकांमध्ये अस्वस्थता**

इराणच्या आग्नेय व ईशान्य भागांत अरब, अझेरी, बलुची, कुर्द आणि टर्की इत्यादी अल्पसंख्याकांचे वास्तव्य आहे. इस्लामिक क्रांतीला त्यांचा पाठिंबा नव्हता. समाजजीवनातील इस्लामचे वर्चस्व त्यांना पटलेले नाही. इराणमधील पर्शियन संस्कृतीच्या प्रभावामुळे या अल्पसंख्याकांना व्यावसायिक व सामाजिकदृष्ट्या भेदभावाला सामोरे जावे लागते, अशी त्यांची तक्रार आहे. या शिवाय सरकारने शहरी भागांतच विकासाची धोरणे राबविल्याने सुधारणांची फळेही या नागरिकांना चाखायला मिळालेली नाहीत. त्यामुळे देशांतर्गत अस्वस्थतेत या नागरिकांच्या अस्वस्थतेचीही भर पडली आहे.

इराक युद्धानंतर इराकमधील कुर्दांचा प्रश्न प्रकर्षाने पुढे आला असून इराणमधील कुर्दांना त्यांच्याप्रती सहानुभूती वाटू लागली आहे. इराणच्या ईशान्य प्रांतातील डोंगराळ भागांत इराणी कुर्दांचे वास्तव्य असून तेथे टर्की, इराक आणि इराण या देशांच्या सीमा एकत्र येतात. इराकमधील कुर्दांचा प्रश्न चर्चेत आल्याने आता या प्रांताच्या विकासाकडे इराणच्या सरकारचे लक्ष जाईल, अशी इराणमधील कुर्दांची अपेक्षा आहे. कुर्द हे सुन्नी पंथाचे अनुयायी असून इराणमध्ये शियापंथीयांचे प्राबल्य आहे. टर्कीमध्येही कुर्दांचा प्रश्न असून इराणमधील कुर्द गटाला टर्कीमधील कुर्द गटाचे सहकार्य मिळते आहे. त्यामुळे २००५नंतरच्या काळात इराणमधील कुर्द गट आणि इराणचे सुरक्षासैनिक यांच्यात सशस्त्र चकमकी झाल्या आहेत. इराकमधील कुर्दांचाही इराणमधील कुर्दांना पाठिंबा असून इराकमधील कुर्दांना अमेरिकेकडून पाठबळ मिळत असल्याचे इराणच्या सरकारला वाटते. इराण-इराकच्या सीमावर्ती भागात अरबांचा प्रभाव असून इराणच्या सुरक्षासैन्याबरोबर अरबांचाही संघर्ष झालेला आहे. बलुचींबाबत व अझेरींबाबतही असे घडते आहे.

## राजकीय रस्सीखेच

इराणमधील या घटनांमध्ये इराणमधील राजकारणही महत्त्वाचे ठरते आहे. अयातोल्ला खोमेनी यांच्या निधनानंतर खामेनी यांच्याकडे सत्तासूत्रे आली असली तरी खामेनींना नागरिकांचा मोठ्या प्रमाणावर पाठिंबा नाही. इस्लामचे धर्मगुरू बनण्यासाठी असलेल्या सर्व पायऱ्या चढतचढत ते या पदाला पोहचलेले नाहीत, असे म्हटले जाते. संसद, अध्यक्ष आणि न्यायमंडळ यांचा सहभाग असलेल्या या यंत्रणेत सर्वोच्च धार्मिक नेते खामेनी यांच्या हाती बरीच सत्ता आहे. म्हणजे न्यायमंडळ हे थेट त्यांच्या अखत्यारित येते. 'गार्डियन कौन्सिल'मध्ये या न्यायमंडळाच्या प्रमुखाचा सहभाग असतो. आपल्या विरोधी गटांना नमविण्यासाठी व स्वतःचे वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी खामेनी आपल्या अधिकारांचा उपयोग करून घेतात, तसेच इराणचे विद्यमान अध्यक्ष अहमदीनेजद हे कट्टरपंथीयांमध्ये मोडतात आणि त्यांच्या निवडीमागे खामेनी यांचीच व्यूहरचना आहे, असे जाणकार म्हणतात.

२००५मध्ये झालेल्या निवडणुकीत अहमदीनेजद यांचा विजय झाल्याने अली अकबर हाशेमी रफसंजानी आणि मोहम्मद खातामी यांच्यासारखे सुधारणावादी नेते मागे पडले. अहमदीनेजद यांनी आर्थिक सुधारणा व विकास हे मुद्दे निवडणुकीच्या प्रचारात मांडले होते. पण त्यांच्या कारकीर्दीत भ्रष्टाचार वाढला आणि अपेक्षेप्रमाणे आर्थिक विकासही झाला नाही. नागरिकांच्या जीवनमानात सुधारणा होण्याऐवजी ते अधिक बिकट झाले. तेथे बेरोजगारी वाढली. चलनवाढ झाली आणि घरांच्या किंमतीही वाढल्या. ऑक्टोबर २००७मध्ये त्यांनी तेहरान विद्यापीठाला भेट दिली तेव्हा विद्यार्थ्यांनी निदर्शने केली. 'डेथ टू द डिक्टेटर' अशा घोषणाही देण्यात आल्या. यावरून तेथील नागरिकांच्या मनांतील नाराजीचा अंदाज यावा. असे असले तरी चालू वर्षाच्या मार्च महिन्यात तेथे झालेल्या निवडणुकीत अहमदीनेजद यांचाच गट विजयी झाला आहे. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे इराणच्या 'गार्डियन कौन्सिल'ने सुधारणावादी गटांच्या उमेदवारांना मान्यताच दिली नाही आणि अशी मान्यता नसेल तर उमेदवाराला निवडणुकीच्या रिंगणात उतरताच येत नाही. या 'गार्डियन कौन्सिल'वर खामेनी आणि अहमदीनेजद यांचेच वर्चस्व आहे. अशा परिस्थितीतही तेथे अहमदीनेजद यांच्या विरोधातील गट सक्रिय बनण्याचा प्रयत्न करीत आहेत. म्हणून आक्रमक भूमिका घेऊन आखातातील राजकारणात आपले वर्चस्व प्रस्थापित करण्याचा इराणचा प्रयत्न आहे. ही खेळी विद्यमान सरकारला तारून नेणार का, हा प्रश्न सध्यातरी अनुत्तरित आहे. ✿✿

# ANNOUNCEMENT

INDIAN SCHOOL OF POLITICAL ECONOMY

is pleased to announce the following scheme recently introduced for subscription of the ***Journal of Indian School of Political Economy (JISPE)*** for the Block Period of Three and Five years at a substantial concession resulting in huge savings (up to 33.3%) to the new as well as existing subscribers as under, provided that the subscription amount is remitted in lump-sum on or before 1st May 2008.

| ***Subscription Category*** | ***Yearly Subscription*** | ***Three Year subscription*** | ***Five Year Subscription*** |
|---|---|---|---|
| *Universities & Institutes* | *Rs. 600/-* | *Rs. 1500* | *Rs. 2000/- Plus ** |
| ***Savings*** | ***Nil*** | ***Rs. 300/-*** | ***Rs. 1000/-*** |
| *Individuals & Colleges* | *Rs. 300/-* | *Rs. 750/-* | *Rs. 1000/-* |
| ***Savings*** | ***Nil*** | ***Rs. 150/-*** | ***Rs. 500/-*** |
| *Savings Per cent* | *Nil* | *16.2%* | *33.3%* |

* Statistical supplement to the special issue of the JISPE on 'Political Parties and Election in Indian States : 1990-2003' comprising 335 pages and costing Rs.325/- absolutely free till stocks last.

**For more details write or email to:**


The Administrative Officer,
Indian School of Political Economy,
'Arthabodh', 968/21-22, Senapati Bapat Road,
Pune 411016

Email : ispe@vsnl.net — Phone - 25657132
Fax - 25657697 — - 25657210

# इंडोनेशियात 'सॉफ्ट इस्लाम' !

अलीकडच्या काळात इस्लाम आणि इस्लामी देश हे कायमच चर्चेचे विषय बनलेले आहेत. मूलतः इस्लाम व त्याचे तत्त्वज्ञान संपूर्ण जगात एकच असले तरी इस्लामचा प्रचार, प्रसार ज्या देशांमध्ये झाला तेथे तेथे त्यावर स्थानिकतेचा अल्पसा का होईना पण परिणाम झाला. त्यामुळे काही प्रमाणात, वेगवेगळ्या देशांत त्याचे वेगळे स्वरूप आढळते. विशेषतः, मध्य आशियातील देशांमध्ये त्याचे स्वरूप जेवढे कट्टर आहे तेवढी कट्टरता इतर देशांमधील इस्लाममध्ये आढळतेच असे नाही. सौदी अरेबिया, इराण येथे कट्टर इस्लामचा प्रभाव दिसतो. इंडोनेशियात मुस्लिम बहुसंख्य असूनही तेथे अशी कट्टरता कमी प्रमाणात आढळते. अलीकडे, तेथे क्वचित कुठेकुठे इस्लामचे आक्रमक रूप पुढे आले असले तरी तेथे प्राधान्याने 'सॉफ्ट इस्लाम' आणण्याचा प्रयत्न होतो आहे. 'Islam Lunak', अशी संज्ञा इंडोनेशियातील इस्लामचा अभ्यास करणाऱ्या अभ्यासकांनी वापरली आहे. विशेषतः, पुढील वर्षी होणाऱ्या निवडणुकांच्या संदर्भात 'सॉफ्ट इस्लाम'चे महत्त्व वाढते आहे. तेथील 'सेक्युलर' पक्ष 'इस्लामिक' शाखा ('इस्लामिस्ट' नव्हे) उघडून याचा प्रचार करीत आहेत.

इंडोनेशियात काही सुधारणावादी गट कार्यरत झाले आहेत. अलीकडेच तेथे इस्लामसमर्थक गटाने अश्लीलतेसंदर्भात एक विधेयक पुढे आणले होते. त्यानुसार इस्लामेतर मुली वा स्त्रिया यांनाही तोकडे कपडे घालता येणार नव्हते. तसेच तेथील हिंदूंच्या परंपरागत नृत्यप्रकारावर बंधने येणार होती. पण यावर बरीच टीका झाली. सुधारणावादी गटांनीही त्याला विरोध केल्याने हे विधेयक मंजूर होऊ शकले नाही. आणखी एक लक्षात घेण्यासारखी बाब अशी की ११ सप्टेंबरच्या घटनेनंतर इंडोनेशियात दहशतवादाचा प्रवेश झाला असे म्हटले गेले. विशेषतः, २००२ सालच्या ऑक्टोबर महिन्यात बाली येथे झालेल्या बॉबस्फोटानंतर इंडोनेशियातील दहशतवादाची चर्चा जागतिक पातळीवर होऊ लागली. पण आता सरकारने दहशतवादासंदर्भात कडक भूमिका घेतली आहे. 'जेमाह इस्लामिया' हा दहशतवादी गट तेथे कृतिशील असून या गटाच्या अतिरेक्यांना अटक करण्यासाठी सरकारने दोन विशेष पथके नियुक्त केली असल्याने गेल्या दोन वर्षांत तेथे बालीसारख्या घटनांची पुनरावृत्ती झाली नाही.

इंडोनेशियातील 'सॉफ्ट इस्लाम'चे स्वरूप समजून घेण्यासाठी तेथील धार्मिक व राजकीय घडामोडींवर एक नजर टाकणे उचित ठरावे. १९९८मध्ये जनरल सुहार्तो यांची (सेक्युलर) कारकीर्द संपुष्टात आल्यानंतर इंडोनेशियाची वाटचाल लोकशाहीकडे झाली. त्यानंतर स्थानिक संस्थाच्या थेट निवडणुका होऊ लागल्या आणि त्यांना स्वायत्तता मिळाली. या वेळी काही संस्थांनी शरियाचा मुद्दा पुढे रेटला. पण राजकारणात मते मिळविण्यासाठी असे मुद्दे उपयोगी ठरत असले तरी राजकीयदृष्ट्या त्यांची अंमलबजावणी करणे त्यांच्यासाठी तेवढे सोपे ठरले नाही. उदाहरणार्थ, एका जिल्ह्यात हिजाब बांधणाऱ्या मुलींची संख्या वाढली पण त्याच वेळी वेश्याव्यवसाय, मद्यपान आणि जुगार यांत सहभागी होणाऱ्यांची संख्याही वाढली. शरियाची अंमलबजावणी व्हावी असे तत्त्वतः मान्य करणारे प्रत्यक्ष अंमलबजावणीच्या वेळी सहकार्य करतातच असे नाही, असा अनुभव प्रशासनाला काही ठिकाणी आला. असे घडण्यामागे एक महत्त्वाचे कारण म्हणजे इंडोनेशियात सुमारे ८७ टक्के नागरिक इस्लामधर्मीय असले तरी तेथील इस्लाम आणि मध्य आशियातील इस्लाम यांत फरक आहे. इंडोनेशियातील इस्लामवर हिंदू संस्कृतीचा परिणाम झालेला आढळतो. कारण, मुळात इंडोनेशियात इस्लामचा प्रवेश झाला तो भारतीय व्यापारी आणि सूफी संतांद्वारे. स्थानिक चालीरीती, बौद्ध तसेच हिंदू धर्म आणि इस्लाम यांचा एक संगमही तेथे आढळतो. त्यास Kebatinam असे म्हणतात. १९४५च्या घटनेद्वारे या Kebatinamला कायदेशीर मान्यताही देण्यात आली आहे. दिवंगत माजी अध्यक्ष सुहार्तो स्वतःला या विचारपंथाचे अनुयायी मानत असत. १९९८पर्यंत लष्करशाहीच्या प्रभावामुळे इंडोनेशियातील नागरिकांच्या धार्मिक भावना कोंडल्या गेल्या होत्या. लोकशाहीची स्थापना झाल्यानंतर तेथील धार्मिक गटांना मोकळेपणा मिळाला. त्यानंतर राजव्यवहारात/प्रशासनात इस्लामची भूमिका काय असावी याबाबत तेथे चर्चा चालू झाली. विशेषतः भ्रष्टाचाराविरुद्ध लढण्यासाठी धर्माची (धार्मिक नीतिमूल्यांची) मदत होईल का, धार्मिक दहशतवादाला चोख प्रत्युत्तर कोणते, असे काही प्रश्न तेथे चर्चिले जात आहेत.

लक्षात घेण्यासारखी बाब अशी की, जगभरातील मुस्लिम समाजांच्या तुलनेत इंडोनेशियातील मुस्लिम समाज हा सर्वांत 'मॉडरेट' मानला गेला आहे. या संदर्भात तेथील मुस्लिम समाजात साधारणतः तीन गट आढळतात. 'मॉडर्निस्ट' गटात मोडणाऱ्या व्यक्ती राजकीयदृष्ट्या आता अधिक सक्रिय झाल्या असून त्यांची पाश्चिमात्य व धार्मिक या दोन्ही प्रकारच्या शिक्षणाला मान्यता आहे. परंपरागत धर्मगुरू व कुरआनचे

अभ्यासक यांनीच कुरआन व हादिथचा अर्थ लावावा, असे त्यांचे मत नाही. 'लिबरल' गटाचे म्हणणे असे आहे की कुरआनमधील काही बाबी जुन्या झाल्या असून चालू काळाशी त्यांचा काही संबंध नाही. हा गट पाश्चिमात्य विचारसरणीला जवळ करतो आणि पाश्चिमात्यांनाही तो जवळचा वाटतो. तर 'लिटरलिस्टिक' गटाच्या मते कुरआनचा नव्याने अर्थ लावण्याची गरज आहे.

या शिवाय 'मॉडर्निस्ट' या गटातही 'मोहम्मदिया' आणि 'Nahdlatul Ulama - NU' हे दोन उपगट आहेत. या दोन्ही गटांचे मिळून सुमारे सात कोटी सदस्य आहेत. इंडोनेशिया हे 'इस्लामिक राष्ट्र' असावे, असे या दोन्ही गटांना वाटते. 'NU' या गटाचे अब्दुररहमान वाहिद हे १९९९ ते २००१ या काळात इंडोनेशियाचे अध्यक्ष होते. याच गटाचे सध्याचे ज्येष्ठ नेते मसदर फरिद मसौदी यांच्या मते 'इस्लामिक राष्ट्र' याचा अर्थ 'न्यायपूर्ण मार्गाने सर्वांगीण विकास करणारे राष्ट्र' असा आहे. ख्रिस्ती धर्मात जसे 'कॅथॉलिक' व 'प्रॉटेस्टंट' पंथ असतात तशाच प्रकारचे हे दोन्ही गट आहेत, असे अभ्यासक म्हणतात. 'NU' म्हणजे 'कॅथॉलिक' आणि 'मुहम्मदिया' म्हणजे 'प्रॉटेस्टंट'. 'NU' हा गट पारंपरिक कर्मकांडे आणि धार्मिक नेत्यांच्या वर्चस्वाला महत्त्व देतो तर, 'मुहम्मदिया' गट कुरआनला प्राधान्य देतो. अल्लावर श्रद्धा असली तरी या दोन्ही गटांसाठी सहिष्णुता महत्त्वाची मानली गेली आहे. म्हणजे, इंडोनेशियाचा 'सेक्युलर' असणारा मूळ इस्लामिक पाया या दोन्ही गटांना मान्य आहे, असे स्पष्ट होते.

इस्लाममध्ये जे विविध परंपरांचे मिश्रण झाले आहे ते दूर करून इतर मुस्लिम देशांत जसे इस्लामचे पालन केले जाते तसेच धर्मपालन इंडोनेशियातील नागरिकांनी करावे, असे म्हणणाराही गट तेथे आहे. इस्लाममधील जुन्या परंपराचे पालन करावे असा आग्रह धरणाऱ्या या गटाला कधीकधी 'मॉडर्निस्ट' असे संबोधले जाते. तर इंडोनेशियात काळाच्या ओघात इस्लामची जशी जडणघडण झाली ती तशीच राहावी, असे म्हणणारा गट तेथे 'परंपरावादी' म्हणून ओळखला जातो. या दोन गटांतील मतभेद हे गुंतागुंतीचे, गोंधळात टाकणारे आणि वादग्रस्त बनले आहेत. विशेषतः 'मॉडर्निस्ट' गटाने शहरांमधील मदरशांना पाठिंबा दिला असून तेथे 'सेक्युलर' मुद्दे/विषय शिकविले जातील असे स्पष्ट करण्यात आले आहे. परंपरावादी गटाने याबद्दल नाराजी व्यक्त केली आहे. अशा मदरशांमुळे धार्मिक नेत्यांचे अधिकार कमी होतील, असा मुद्दा त्यांनी पुढे आणला आहे. इंडोनेशियातील इस्लामविषयक घडामोडींबाबत अभ्यासक असे मत मांडतात की तेथील नागरिकांनी इस्लामकडे कल दर्शविला असला तरी ते

मूलतत्त्ववादाकडे वळण्याची शक्यता नाही, कारण त्यांची जडणघडण तशी झालेलीच नाही. पण हे नागरिक देशाच्या राजकारणात अपेक्षेइतके सक्रिय बनलेले नाहीत, एकप्रकारची अनास्था त्यांच्या मनांत दिसून येते ही चिंतेची बाब आहे. त्यामुळे परदेशांतील नेत्यांनी व अभ्यासकांनी (मुळातच तेथे नसलेल्या) मूलतत्त्ववादाच्या मुद्यावर चर्चा करून त्याचे महत्त्व वाढवू नये. कारण, त्यामुळे लोकशाही बळकट न होता धार्मिक ध्रुवीकरण होण्याचा धोका वाढतो, असे ते म्हणतात.

१९९९ मध्ये झालेल्या निवडणुकीत तेथील नागरिकांनी इस्लामिक पक्षांच्या बाजूने कल दर्शविला. कारण, मेगावती सरकारचे लक्ष श्रीमंत व मध्यमवर्गाकडे होते. आर्थिकदृष्ट्या मागासघटकांचे कैवारी म्हणून इस्लामिक पक्ष पुढे आले. इंडोनेशियातील काही राजकीय पक्ष या दोन्ही गटांपैकी कोणत्या तरी एका गटाकडे झुकलेले असून त्यांची राजकीय शाखा म्हणून ते अलीकडे सक्रिय झालेले दिसतात. पण राजकीय पक्ष आणि त्यांच्या पालकसंस्था यांच्यात कधीकधी दरी पडते. तेथे नुकत्याच झालेल्या निवडणुकीत पुराणमतवादी राजकीय पक्षाला (प्रॉस्परस जस्टिस -PKS ) मते मिळाली. पण अश्लीलतेसंबंधी विधेयकाला पाठिंबा दिल्याने त्यांच्या लोकप्रियतेला ओहोटी लागल्याचे आढळते. या पक्षाच्या नेत्यांच्या म्हणण्याप्रमाणे पक्षाची पीछेहाट होण्याचे एक कारण म्हणजे विद्यमान अध्यक्ष सुसिलो बाम्बांग युधोयोनो यांच्या संयुक्त सरकारमध्ये पक्षाचा सहभाग आहे आणि अध्यक्ष युधोयोनो यांनी अलीकडे काही कठोर आर्थिक निर्णय घेतल्याने त्याचा फटका या पक्षाला बसला आहे. असे असले तरी या पक्षाला वास्तवतेची जाणीव झाली आहे. या पक्षातील तरुण नेत्यांच्या मते पक्षाला अधिक 'सेक्युलर' बनण्याची गरज आहे. सहिष्णुता मानणारा आणि स्त्रियांच्या हक्कांचा पुरस्कर्ता असणारा हा गट, इंडोनेशियातील विविधवंशीय बुद्धिवादी नागरिकांनी एकत्र येऊन देशांतर्गत प्रश्नांचा विचार करावा, असे प्रतिपादन करतो.

इंडोनेशियातील इस्लामची जडणघडण पाहता तेथील इस्लाम कट्टरतेकडे झुकण्याची शक्यता नाही, असे मत मांडण्यात आले असले तरी या बरोबरच सरकारची आर्थिक धोरणे आणि बेरोजगारी कमी होणे हेदेखील महत्त्वाचे ठरेल, असाही मतप्रवाह आहे. इंडोनेशियातील राजकीय पक्ष आता टर्कीचे उदाहरण आपल्यापुढे ठेवत आहेत. इस्लाम आणि लोकशाही या दोन बाबी हातात हात घालून वाटचाल करू शकतात, असे त्यांना जगाला दाखवायचे आहे. राजकारणात 'सॉफ्ट इस्लाम' आणण्याचा तेथील गटांचा प्रयत्न यशस्वी ठरतो का ते पाहायचे. ✿✿

# कसे असेल उद्याचे शहरी जग...?

आकडे हे मोठे बोलके असतात. अगदी लिखित वा उच्चारलेल्या शब्दांपेक्षाही. कारण लिहिलेल्या वा बोललेल्या शब्दांमध्येही अबोल अशा किती तरी जागा असतात. संख्यांचे मात्र तसे नसते. अगदी चुकलेल्या संख्या वा जाणूनबुजून, दिशाभूल करण्यासाठी मुद्दाम चुकीच्या लिहिलेल्या अथवा सादर केलेल्या आकडेवारीतूनही वास्तव डोकावतेच. हे वास्तव कधी मोठे विलोभनीय असते तर कधी विस्मयकारक. कधी मनोरंजक तर कधी चिंताजनक. कधी विचारप्रवण बनविणारे तर कधी विचारशक्ती क्षीण करणारे. कधी कृतिशील बनविणारे तर कधी काहीही करण्याची-घडविण्याची शक्तीच हरवून टाकणारे. जगभरातील आर्थिक तसेच सामाजिक घडामोडींचे चलनवलन टिपणारा जो एक विभाग संयुक्त राष्ट्रसंघात कार्यरत आहे त्या विभागाच्या लोकसंख्याविषयक अभ्यासशाखेने २०५० सालातील शहरी जग कसे असेल यांबाबतचे अंदाज वर्तविणारी जी आकडेवारी अलीकडेच प्रकाशित केली आहे, ती उपरोक्त सर्वच वर्गांत फिट्ट बसणारी अशी आहे.

जगातील सर्वच देशांमधील शहरी तसेच ग्रामीण लोकसंख्येबाबतचे भविष्यकालीन सुधारित सांख्यिकी अंदाज संयुक्त राष्ट्रसंघाच्या या अभ्यास शाखेतर्फे दर दोन वर्षांनी सादर केले जातात. १९८८ सालापासून हा उपक्रम सुरू आहे. देशोदेशीच्या शहरी आणि ग्रामीण लोकसंख्येच्या आकारमानविषयक अंदाजांबरोबरच विविध देशांमधील मोठ्या नागरी संकुलांच्या भविष्यकालीन लोकसंख्येविषयीदेखील या अहवालांमध्ये अंदाजित आकडेवारी मांडलेली असते. त्या उपक्रमांतर्गत, २००६ साली जो अहवाल तयार करण्यात आला होता त्या अहवालाची सुधारित आवृत्ती संयुक्त राष्ट्रसंघाच्या लोकसंख्याविषयक संशोधन व अभ्यासशाखेने आता तयार केली आहे. १९५० ते २०५० असा पुऱ्या शतकभराचा कालखंड या अभ्यासाच्या कक्षेत सामावलेला आहे. नागरीकरणाचा जो विस्तार १९५० ते २००७ या दरम्यान जगभरात घडून आला त्याचा मागोवा घेत घेत २००७ ते २०५० या कालावधीदरम्यानच्या संभाव्य नागरी विकासासंदर्भातील अंदाज या अभ्यास अहवालात वर्तविण्यात आलेले आहेत. विविध देश व प्रांतांतील जननदरांत, स्थलांतरणाच्या वेगात व दिशेत आजवर दृग्गोचर झालेले

बदल, त्या बदलांचा कल, आगामी काळात या दरांमधील बदलाच्या संभाव्य दिशा यांबाबतची काही गृहितके मांडून भविष्यकाळाबद्दलचे सांख्यिकी अंदाज बांधण्यात आलेले आहेत. या आकडेवारीच्या सादरीकरणासाठी जगाची विभागणी आफ्रिका, आशिया, युरोप, लॅटिन अमेरिका व कॅरेबियन, उत्तर अमेरिका व सामुद्रिक प्रदेश अशा सहा मोठ्या प्रदेशांत आणि एकंदर २१ विभागांत करण्यात आलेली आहे.

भविष्याबाबतचे कोणतेच सांख्यिकी अंदाज हे १०० टक्के चूक वा बरोबर असे कधीच असत नाहीत. परंतु, एकंदरच समाजजीवनाचे व्यवस्थापन करणारी शासकीय व प्रशासकीय यंत्रणा, विविध समाजसमूहांच्या विविक्षित गरजांच्या पूर्ततेसाठी शासकीय प्रयत्नांना समांतर प्रयत्नांचा टेकू पुरविणाऱ्या बिगर शासकीय संस्था-संघटना, समाजाभ्यासक यांच्याप्रमाणेच सर्वसामान्य नागरिकांनाही, भविष्यात आपल्याला वा आपल्या पुढील पिढ्यांना कोणत्या वास्तवाचा सामना करावयास लागणार आहे, भविष्यातील आव्हांनाचा सामना करण्यासाठी कोणत्या प्रकारची पूर्वतयारी करणे अगत्याचे आहे यांबाबतची अगदी ढोबळ अशी पूर्वकल्पना येण्यास हे सारे अंदाज उपयुक्त ठरतात यांबाबत तरी दुमत नसावे.

जगाची एकंदर लोकसंख्या आणि नागरी लोकसंख्या या दोहोंतही आगामी चार दशकांत मोठे रोचक बदल संभवतात असा या अहवालाचा सांगावा आहे. सन २००७ ते २०५० या ४३-४४ वर्षांदरम्यान जगाच्या एकूण लोकसंख्येत सुमारे २५० कोटींची भर पडेल, असा कयास आहे. परिणामी, जागतिक लोकसंख्या ६७० कोटींवरून जवळपास ९२० कोटींवर पोहोचावी. याच कालावधीदरम्यान जगभरातील शहरवासियांच्या संख्येत ३१० कोटी लोकसंख्येची भर पडेल, असा अंदाज आहे. साहजिकच, २००७ साली ३३० कोटींच्या आगेमागे असलेली जगभरातील शहरी लोकसंख्याही कोटीच्याकोटी उड्डाणे घेत २०५० सालापर्यंत थेट ६४० कोटींवर जाईल, असे भविष्य हा अभ्यास वर्तवतो. या आकडेवारीच्या जंजाळात लपलेली खरी गंमत इथे आहे. आली का ती ध्यानात ? मेख अशी आहे की, २००७ ते २०५० या दरम्यान जगाच्या एकंदर लोकसंख्येत पडणारी एकंदर भर जगातील शहरी विभागच आपल्यात जिरवून टाकतील, असे दिसते ! शिवाय, ग्रामीण जगातील काही रहिवाशांनाही हे शहरी विभाग सर्वोदारपणे सामावून घेतील.

आजवरच्या मानवी इतिहासातील एक अतिशय मूलगामी स्थित्यंतर चालू वर्षातच साकारणार आहे, हे वास्तव आपल्यापैकी अनेकांना यापूर्वीच ज्ञात झालेले

असावे. जगभरातील नागरी विभागांत वास करणाऱ्या नागरी नागरिकांची संख्या जगभरच्या ग्रामीण भागांतील रहिवाशांपेक्षा अधिक भरण्याची घडी याच २००८ सालात अवतरणार आहे. येत्या ४३-४४ वर्षांत जगाच्या एकूण लोकसंख्येत पडणाऱ्या संभाव्य भरीपेक्षाही अधिक भर जगभरातील शहरी लोकसंख्येत पडण्याची शक्यता आहे, याचाच अर्थ हा की इथून पुढे जगातील ग्रामीण लोकसंख्येस ओहोटी लागणार. संयुक्त राष्ट्रसंघाच्या या अहवालानुसार, २०५० सालातील जगभरची ग्रामीण लोकसंख्या ही आजच्यापेक्षा अदमासे ६० कोटींनी तरी कमी भरेल. याहीपुढची गंमत म्हणजे, शहरी लोकसंख्येत अपेक्षित असलेल्या या वाढीतील बव्हंश वाढ ही जगातील तुलनेने कमी विकसित भागांमध्ये वसलेल्या शहरांमध्येच घडून येईल, असे दिसते. अहवालात मांडण्यात आलेल्या अभ्यासानुसार, शहरी लोकसंख्येत संभवणाऱ्या वाढीतील सर्वाधिक म्हणजे जवळपास १८० कोटींची वाढ ही एकट्या आशिया खंडात घडून येईल. आफ्रिका (९० कोटी) आणि लॅटिन अमेरिका व कॅरेबियन (२० कोटी) हे त्या नंतरचे अनुक्रमे दुसऱ्या व तिसऱ्या क्रमांकाचे मानकरी ! म्हणजेच, इथून पुढच्या काळात जागतिक लोकसंख्येत घडून येणारी वाढ हे मुख्यतः विकसनशील देशांमधील शहरी विभागांत साकारणाऱ्या लोकसंख्यावाढीचे फलित संभवते.

परिणामी, जगभरातील नागरीकरणाची सरासरी पातळी इथून पुढच्या काळात वाढत जाईल. अर्थात, ही वाढ सर्वत्र समान असणार नाही. परंतु, आजही ती तशी नाही हे ध्यानात घेतलेच पाहिजे. एखाद्या भूप्रदेशाच्या एकंदर लोकसंख्येपैकी किती टक्के लोकसंख्या त्या प्रदेशातील शहरी विभागांत राहते, त्यावर त्या प्रदेशाची नागरीकरणाची पातळी निश्चित होते. २००७ सालातील ही टक्केवारी बघितली तर विकसित देशांमध्ये नागरीकरणाची ही सरासरी पातळी जवळपास ७४ टक्के इतकी होती. विकसनशील देशांमध्ये हीच सरासरी होती अवघी ४४ टक्के. २०५० सालापर्यंत विकसित देशांमधील नागरीकरणाची ही सरासरी पातळी ८६ टक्क्यांपर्यंत उंचावेल, असा कयास संयुक्त राष्ट्रसंघाचा हा अहवाल व्यक्त करतो. विकसनशील देशही या प्रक्रियेत मागे राहणार नाहीत, मात्र या गटातील देशांमधील नागरीकरणाची सरासरी पातळी २०५० सालापर्यंत सुमारे ६७ टक्क्यांपर्यंत वर सरकेल. यंदाच्या वर्षी जागतिक नागरीकरणाचे सरासरी ५० टक्के इतके असणारे प्रमाण येत्या चार दशकांत चांगले ७० टक्क्यांवर जाईल.

नागरीकरणाच्या सरासरी पातळीतील ही तफावत केवळ 'विकसित' आणि 'विकसनशील' या दोन देशसमूहांपुरतीच सीमित आहे, असे समजण्याचे कारण नाही.

या बाबतीत विकसित देशांच्या समूहातही भरपूर वैविध्य आढळून येते. नागरीकरणाच्या जागतिक स्तरावरील स्पर्धेत ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड आणि उत्तर अमेरिका हे आजमितीस आघाडीवर असलेले देश-प्रदेश गणले जातात. या तिहींची नागरीकरणाची सरासरी पातळी ८० टक्क्यांवर आहे. विकसित देशांच्या समूहात त्यातल्या त्यात युरोपच काय तो नागरीकरणात तुलनेने 'मागासलेला' दिसतो ! कारण, युरोपमधील नागरीकरण ७०-७२ टक्क्यांच्या परिघात रेंगाळलेले आहे. अगदी २०५० सालीदेखील युरोपचे हे तौलनिक 'मागासलेपण' दूर हटेल असे वाटत नाही. कारण, ऑस्ट्रेलिया-न्यूझीलंड-उत्तर अमेरिकेतील सरासरी नागरीकरण ९० टक्क्यांचा टप्पा ओलांडून जाईल त्या वेळी युरोपातील नागरीकरण ८४टक्क्यांना स्पर्शत असेल.

## नागरीकरणातील असमता

जगभरातील नागरी लोकसंख्येचे भौगोलिक स्थानांकन आणि विविध देशांमधील तिचे वर्गीकरणही अभ्यसनीय आहे. २००७ साली ३३० कोटींच्या घरात असलेल्या शहरी लोकसंख्येपैकी तब्बल तीन चतुर्थांश शहरी लोकसंख्या जगभरातील केवळ २५ देशांमध्येच काय ती एकवटलेली होती. या २५ देशांमध्ये सात देश असे आहेत की, ज्यांची नागरीकरणाची सरासरी पातळी २७ ते ५० टक्क्यांच्यादरम्यान आहे. बांगला देश, चीन, भारत, इंडोनेशिया, नायजेरिया, पाकिस्तान यांसारख्या लोकसंख्याबहुल देशांचा या सातांमध्ये समावेश आहे. आगामी काळात जगभरातील शहरी लोकसंख्येत जी वाढ अपेक्षित आहे तिच्या भौगोलिक विभाजनाचा आलेखही असमानच संभवतो. २००७ ते २०२५ या कालावधीदरम्यान जगाच्या शहरी लोकसंख्येत जी १३० कोटींची भर अपेक्षित आहे तिच्यात चीन आणि भारत याच दोन महाकाय देशांचा एकत्रित हिस्सा सुमारे ३५ टक्क्यांचा असेल. या कालावधीत शहरी चीनची लोकसंख्या अदमासे २६ कोटींनी तर, शहरी भारताची लोकसंख्या साधारणपणे २० कोटींनी वाढण्याची शक्यता प्रस्तुत अभ्यास वर्तवतो.

सन २०२५ नंतरचे चित्र मात्र अधिकच मनोरंजक संभवते. २०२५ ते २०५० दरम्यान जगाच्या शहरी लोकसंख्येत आणखी १८० कोटींची जी वाढ अपेक्षित आहे त्या वाढीच्या भागीदारीत मात्र भारत चीनवर कुरघोडी करील, असे दिसते. अहवालात व्यक्त करण्यात आलेल्या अंदाजानुसार, या संभाव्य वाढीत शहरी भारताचा हिस्सा असेल सुमारे ३८ कोटींचा तर, नागरी चीनचा वाटा असेल अदमासे २१ कोटींचा. मात्र, देशोदेशीच्या शहरी लोकसंख्येचे सांख्यिकी आकारमान लक्षात घेतले तर १००

कोटी एवढी अवाढव्य नागरी लोकसंख्या बाळगणारा चीनच २०५० साली अव्वल स्थानावर असेल. ९० कोटी इतकी (संभाव्य) शहरी लोकसंख्या असणारा भारत या रांगेत दुसऱ्या क्रमांकावर उभा ठाकलेला दिसावा. २०२५ ते २०५० या कालावधीदरम्यान जगभरातील शहरी लोकसंख्येत घडून येणाऱ्या एकंदर वाढीमध्ये चीन आणि भारत यांचा एकत्रित वाटा सुमारे ३२ टक्क्यांचा संभवतो.

जगभरातील शहरी लोकसंख्येच्या भौगोलिक विभाजन-वितरणातच काय ती असमानता दिसून येते, असेही नाही. जगातील ग्रामीण लोकसंख्येच्या भौगोलिक स्थानांकनातही संतुलनाचा अभावच दिसतो. २००७ सालातील जगाच्या ग्रामीण लोकसंख्येचा विचार केला तर, एकंदर ग्रामीण लोकसंख्येपैकी ७५ टक्के लोकसंख्या अवघ्या १८ देशांमध्येच काय ती सामावलेली असल्याचे चित्र दिसते. ८३ कोटींची ग्रामीण लोकसंख्या असणारा भारत आणि ७७ कोटींची ग्रामीण लोकसंख्या असणारा चीन हे या १८ देशांच्या गटातील दोन दिग्गज. जगभरातील एकंदर ग्रामीण लोकसंख्येपैकी चांगली ४७ टक्के ग्रामीण लोकसंख्या याच दोन देशांत एकवटलेली दिसते.

जागतिक स्तरावरील एकूण शहरी लोकसंख्येचे जगातील वेगवेगळ्या आकारमानाच्या शहरांमधील विभाजनही जितके मनोरंजक तितकेच चिंतनीय आहे. अहवालात सादर करण्यात आलेली २००७ सालची आकडेवारी बघितली तर, एकंदर जागतिक शहरी लोकसंख्येपैकी ५२ टक्के शहरी लोकसंख्या पाच लाख वा त्यापेक्षा कमी लोकसंख्या असणाऱ्या शहरांमध्ये सामावलेली दिसत होती. हाच 'ट्रेन्ड' यापुढील काळातही अबाधित राहील अशी अटकळ संयुक्त राष्ट्रसंघाचा हा अहवाल बांधतो. आगामी दोन दशकांत, म्हणजे, २०२५ सालापर्यंत जागतिक स्तरावरील शहरी लोकसंख्येत जी वाढ घडून येणे संभवते त्यापैकी निम्मी वाढ पाच लाख अथवा त्यांपेक्षा कमी लोकसंख्या असलेली ही शहरे जिरवतील असा होरा आहे.

लोकसंख्येच्या आकारमानानुसार साकारलेली शहरांची जी जागतिक स्तरावरील उतरंड आहे तिच्यातील हा झाला सर्वांत तळातील स्तर. या वरचा थर आहे तो पाच लाखांपेक्षा अधिक मात्र १० लाखांपेक्षा कमी लोकसंख्या असणाऱ्या शहरांचा. २००५ सालासाठीच्या आकडेवारीचा हवाला द्यायचा तर या गटातील शहरांची संख्या जगभरात तेव्हा ४४६ इतकी होती. आगामी २० वर्षांत या गटातील शहरांच्या संख्येत १०५ शहरांची नव्याने भर पडून २०२५ साली त्यांची संख्या ५५१ पर्यंत वाढेल, असा अंदाज आहे. २०२५ सालातील जागतिक शहरी लोकसंख्येपैकी सुमारे साडेआठ

टक्के शहरी लोकसंख्या या गटातील शहरांमध्ये सामावलेली असेल. यापेक्षा आकाराने मोठ्या असलेल्या शहरांचा गट आहे तो म्हणजे लोकसंख्या १० लाखांपेक्षा अधिक परंतु ५० लाखांपेक्षा कमी असलेल्या शहरांचा. या गटात २००७ साली जगभरात एकंदर ३६१ शहरे होती. संयुक्त राष्ट्रसंघाच्या प्रस्तुत अहवालानुसार या गटातील शहरांची संख्या २०२५ साली ५२४पर्यंत वाढावी. तत्कालीन एकंदर नागरी लोकसंख्येपैकी जवळपास २३ टक्के नागरी लोकसंख्या या गटातील शहरांमध्ये निवास करीत असेल, असा कयास हा अहवाल बांधतो. शहरांच्या जागतिक उतरंडीत या वरचा स्तर आहे तो ५० लाखांपेक्षा अधिक परंतु एक कोटीपेक्षा कमी लोकसंख्या असणाऱ्या शहरांचा. २००७ साली जगभरात अशी ३० शहरे होती. २०२५ मध्ये ही संख्या वाढून ४८ वर पोहोचेल असा अंदाज आहे. एकूणांतील सात टक्के नागरी लोकसंख्येस ही शहरे आपल्या ठायी तेव्हा आश्रय देतील.

उरात धडकी भरावी अशी विशाल शहरे म्हणजे एक कोटीपेक्षा अधिक लोकसंख्या असलेली महाकाय महानगरे. या गटातील शहरांसाठी, संयुक्त राष्ट्रसंघाचा प्रस्तुत अहवाल 'मेगा सिटीज्' अशी संज्ञा योजतो. गेल्या वर्षी जगात अशा एकूण १९ 'मेगा सिटीज्' होत्या. येत्या दोन दशकांत 'मेगा सिटीज्'च्या या संख्येत आठाची भर पडेल असा या अहवालाचा सांगावा आहे. म्हणजेच, २०२५ साली त्यांची संख्या २७ इतकी असेल. २००७ सालातील एकंदर जागतिक शहरी लोकसंख्येपैकी सुमारे ९ ते १० टक्के शहरी लोकसंख्या या 'मेगा सिटीज्'मध्ये वास करीत होती. २०२५ सालातही हे प्रमाण फारसे बदलण्याची शक्यता नाही. सगळ्यात गंमत आहे ती या 'मेगा सिटीज्'च्या भौगोलिक स्थानांकनाची. २००७ साली अस्तित्वात असलेल्या १९ 'मेगा सिटीज्'पैकी सर्वाधिक म्हणजे ११ 'मेगा सिटीज्' या आशिया खंडात होत्या. त्या खालोखाल क्रमांक लागतो तो लॅटिन अमेरिकेचा. १९ पैकी चार 'मेगा सिटीज्' या लॅटिन अमेरिकेत होत्या. उत्तर अमेरिकेत एकूणांतील दोन 'मेगा सिटीज्' होत्या तर, आफ्रिका व युरोपात प्रत्येकी एक एक 'मेगा सिटी' होती. येत्या २० वर्षांत 'मेगा सिटीज्'च्या या संख्येत जी आठांची भर अपेक्षित आहे त्यापैकीही पुन्हा सर्वाधिक म्हणजे पाचांची भर ही आशियात संभवते. त्या खालोखाल आहे आफ्रिका (दोन मेगा सिटीज्) आणि सर्वांत खाली आहे युरोप (केवळ एक नवीन मेगा सिटी).

शहरी वाढ मुळातच हाताबाहेर चाललेल्या आशिया खंडाबाबत आता काय बोलावे ? की काहीही न बोललेलेच बरे !

# आव्हान, ग्रामीण रोजगाराचे...

आर्थिक पुनर्रचना कार्यक्रमाची अंमलबजावणी आपल्या देशात सुरू झाल्यापासून 'ग्रामीण' आणि 'शहरी' हे द्वैत अधिक सघन बनल्याचे प्रतिपादन आजवर सातत्याने केले गेले आहे. किंबहुना, आर्थिक सुधारणा कार्यक्रम हा शेतीसह एकंदरच ग्रामीण विश्वाला डावी घालून पुढे गेल्यामुळेच 'जॉबलेस ग्रोथ'च्या वास्तवाची कटू फळे सुधारणांच्या वेलीला येत आहेत, असेही लिहिले-बोलले जाते. या भूमिकेत सत्याचा अंश खूपच मोठा आहे. देशातील रोजगाराच्या आजच्या जडणघडणीत तसेच गेल्या १६-१७ वर्षांत त्या जडणघडणीत साकारलेल्या बदलांमध्ये या सत्वांशाचे प्रतिबिंब पडलेले दिसते. सुधारणा कार्यक्रमाचा लाभ मुख्यत्वेकरून माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञानाधारित सेवा, वित्तीय सेवा, विमा, बँकिंग, व्यापार, वितरण, दळणवळण, संदेशवहन यांसारख्या शहरी तोंडवळ्याच्या आधुनिक क्षेत्रांनाच आजवर प्रामुख्याने झाला आहे. साहजिकच, या क्षेत्रांना गरज असलेल्या उच्च प्रकारच्या शैक्षणिक तसेच दर्जेदार व्यावसायिक कौशल्यांची मागणी पूर्ण करणाऱ्या तुलनेने मूठभर कुशल उच्चशिक्षितांसाठी लठ्ठ पगाराच्या रोजगार संधींचे दरवाजे सताड खुले झाले, परंतु अल्पशिक्षित, अकुशल हातांना मात्र या क्षेत्रांनी दूरच लोटले असे निरीक्षण या क्षेत्रातील अभ्यासक मांडतात. खास करून यात आबाळ झाली ती ग्रामीण भागांतील अकुशल, अर्धकुशल, अशिक्षित तसेच अल्पशिक्षित मनुष्यबळाची. रोजगाराच्या आकृतिबंधातील नेमक्या याच असमतोलावर उपाय म्हणून राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेचा उपक्रम हाती घेतला गेल्याचेही या संदर्भात सांगितले जाते.

ही वस्तुस्थिती कोणीही नाकारणार नाही. परंतु, ग्रामीण भागांतील हातांना उत्पादक स्वरूपाचा रोजगार पुरविण्याचे आव्हान वास्तवात केवळ भारतापुढेच आहे, अशातला भाग नाही. विविध विकसनशील देशांपुढे आजमितीस हाच प्रश्न उभा आहे. या प्रश्नाचे सर्वांत तीव्र परिमाण बघावयास मिळते ते देशोदेशीच्या ग्रामीण भागांतील भूमिहीन कुटुंबे तसेच अकुशल श्रमिकांच्या समाजस्तरांत. वाढणाऱ्या लोकसंख्येबरोबर श्रमदलात भर पडत जाते. भारत आणि बांगला देशासारख्या रोजगाराच्या दृष्टीने आजही कृषिप्रधानच असणाऱ्या देशांच्या ग्रामीण श्रमदलात दर वर्षी अनुक्रमे ४०

लाख आणि १० लाखांची भर पडते. श्रमदलांत प्रतिवर्षी पडणारी भर आणि ग्रामीण भागाच्या अर्थकारणाचा कणा असलेल्या शेतीउद्योगात निर्माण होणाऱ्या रोजगार संधी यांतील तफावत अनेक विकसनशील देशांत आज वाढताना दिसते. परिणामी, ग्रामीण परिसरातील अल्प उत्पादक व अल्प मेहेनताना अदा करणाऱ्या रोजगार संधींमध्ये प्रथमपासूनच गुंतलेल्यांच्या बरोबरीनेच अशा नव्याने सामील होणाऱ्या वाढीव हातांनाही उत्पादक स्वरूपाचे काम पुरविण्याचे आव्हान उत्तरोत्तर बिकटच होत जाते. भारताप्रमाणेच मध्य आफ्रिका, मध्य पूर्व आणि दक्षिण आशियात हा पेच प्रकर्षाने आढळून येतो.

मुख्यतः अंगमेहनतीवरच उपजीविका करणाऱ्या ग्रामीण भागातील अकुशल किंवा अर्धकुशल भूमिहीन अथवा/तसेच अत्यल्प भूधारक श्रमिकापाशी श्रम हाच काय तो एकमात्र उत्पादक घटक असतो. तो विकूनच गुजारा करणे त्याला भाग असते. साहजिकच, अशा हातांना अधिकाधिक उत्पादक स्वरूपाच्या रोजगार संधी पुरेशा प्रमाणात निर्माण करणे, हाच या समाजसमूहांना गरिबीच्या फेऱ्यातून वर काढण्याचा हुकुमी पर्याय ठरतो. ग्रामीण अर्थकारण हे मुख्यतः शेतीकेंद्रित असल्याने शेतीची उत्पादकता वाढली की रोजगार संधींमध्ये वाढ घडून येते, असा सार्वत्रिक अनुभव आहे. परंतु, उत्पादक स्वरूपाच्या रोजगार संधींची ग्रामीण भागांतील वाढती मागणी व गरज ध्यानात घेता, केवळ शेतीमधील सुधारणा व त्याद्वारे निर्माण होणारी रोजगार वाढ ही पर्याप्त ठरणार नाही, ही बाब देशोदेशीच्या नियोजनकर्त्यांच्या आता ध्यानात आली आहे. साहजिकच, ग्रामीण भागांतील बिगर शेती रोजगार संधींचे मार्ग प्रशस्त बनविण्याच्या दिशेने आज ठिकठिकाणी प्रयत्न सुरू आहेत.

जगभरातील ग्रामीण रोजगाराची जडणघडण न्याहाळली तर बरीच विभिन्नता अनुभवास येते. विशेषतः ग्रामीण भागांतील प्रौढ पुरुष श्रमिकांच्या रोजगाराचा आकृतिबंध तपासून बघणे इथे अगत्याचे ठरते. रोपवाटिका, दुग्धोत्पादन, पशुपालन, पोल्ट्री यांसारखे शेतीसंलग्न उद्योगव्यवसाय आणि शेतमालावर प्रक्रिया करणाऱ्या उद्योगांसारखे वा अन्य बिगर कृषी व्यवसाय यांत गुंतलेल्या प्रौढ पुरुष श्रमिकांची एकूण ग्रामीण श्रमिकांमधील टक्केवारी बघितली तर, लॅटिन अमेरिका व कॅरेबियन बेटे, दक्षिण आशिया, उत्तर अमेरिका व मध्य पूर्वेत हे प्रमाण साधारणपणे ४७ ते ४९ टक्क्यांच्यादरम्यान असल्याचे दिसते. तर, पॅसिफिक आणि मध्य पूर्वेच्या प्रदेशात हेच प्रमाण ३८ टक्के इतके असल्याचे आढळते. आफ्रिकेच्या सहारा प्रांतात तर हे प्रमाण अवघे २० टक्के इतकेच आहे.

रोपवाटिका, दुग्धोत्पादन यांसारख्या शेतीसंलग्न क्षेत्रांतील रोजगार हा ग्रामीण भागांतील महिला श्रमिकांच्या लेखी महत्वाचा गणला जातो. मध्य व पूर्व आशिया, युरोप, लॅटिन अमेरिका व कॅरेबियन द्वीपसमूहांच्या ग्रामीण भागांतील प्रौढ श्रमिक महिलांच्या रोजगाराचा अभ्यास केला तर शेतीसंलग्न रोजगार क्षेत्रांत एकूणांतील सुमारे २५ टक्के महिला रोजीरोटी कमावताना दिसतात. दक्षिण आशियातील ग्रामीण महिलांच्या रोजगाराची जडणघडण तपासली तर शेतीजन्य रोजगार वा श्रमाच्या बाजारपेठेत एकूणांतील ११ टक्के महिला सहभागी होतात, असे लक्षात येते. त्याच वेळी, फारच थोड्या महिलांना बिगर शेती व्यवसायांत रोजगार उपलब्ध होत असल्याचेही आढळून येते. पूर्व आशिया व पॅसिफिक, लॅटिन अमेरिका आणि कॅरेबियन बेटांवरील चित्र पाहिले तर ते एकदमच वेगळे दिसते. शेती वा शेतीसंलग्न रोजगारांच्या बाजारपेठेत सहभागी होणाऱ्या महिलांचे प्रमाण या प्रदेशांत कमी आहे. उलट, ग्रामीण अर्थकारणाच्या बिगर शेती क्षेत्रांतच या परिसरातील महिलांचा सहभाग मोठ्या प्रमाणावर असल्याचे इथे अनुभवास येते.

शेतीमधील रोजगार हा प्रामुख्याने शेतीचा हंगाम, शेतीउत्पादनाचे चक्र यांना अनुसरणारा असा असतो. केवळ इतकेच नाही तर, शेतीमधील अनिश्चिततेनुसारही तो हेलकावत असतो. परिणामी, शेतीमधील श्रमिकांच्या मागणीत हंगामानुसार चढउतार अनुभवास येतात. केवळ इतकेच नाही तर, शेतीमधील रोजगाराच्या संधी हा पीकपद्धती आणि शेतीची उत्पादकता या उभय बाबींवरही अवलंबून असतात. व्यापारी वा नगदी पिके, फळबागा व फलोद्यानासारखे उपक्रम शेतीमधील उत्पादकता वाढ आणि रोजगार निर्मिती यांस अतिशय पोषक-पूरक असल्याचे अनेक दाखले जगभरात ठिकठिकाणी मिळतात. तृणधान्य पिकांऐवजी भाजीपाला लागवडीकडे शेतकरी वळले तरी शेतीमधील रोजगाराचे प्रमाण व स्वरूप बदलते. भाजीपाला लागवडीद्वारे एका हंगामात शेतीमधील मनुष्यबळाच्या मागणीत दर हेक्टरी मनुष्यदिवसांमध्ये किमान ५० टक्के ते कमाल तिप्पट-चौपटीपर्यंत वाढ घडून येत असल्याचे अनेक देशांत आढळून आले आहे. मेक्सिकोचे उदारहरण या संदर्भात उल्लेखनीय ठरावे. मेक्सिकोतील सर्वसाधारण शेतकऱ्याने शिवारात मक्याची लागवड केली तर मक्याच्या एका हंगामात दर हेक्टरी सरासरी २९ मनुष्यदिवसांचा रोजगार निर्माण होतो. मात्र, मक्याऐवजी टोमॅटोचे पीक घेतले तर टोमॅटोच्या एका हंगामात सरासरी रोजगाराचे हेच प्रमाण दर हेक्टरी थेट १२२ दिवसांवर जाते.

एकंदरच पाहिले तर ग्रामीण रोजगाराचा आकृतिबंध संपूर्ण जगभरातच बदलतो आहे. ग्रामीण भागांतील बिगर शेती रोजगाराचे एकूणांतील प्रमाण देशोदेशी वाढत असल्याचे अनुभवास येते. लॅटिन अमेरिकेतील काही देशांत ग्रामीण भागांतील बिगर शेती उद्योगव्यवसाय क्षेत्रांचा विस्तार १९८० ते २००० या दरम्यान प्रतिवर्षी सरासरी १० टक्के दराने घडून आल्याचे संबंधित आकडेवारी दर्शविते. बिगर शेती क्षेत्राचा ग्रामीण भागांतील रोजगारात असणारा तौलनिक हिस्सा चिलीमध्ये १९६० ते २००२ या ४२ वर्षांच्या कालावधीत २५ टक्क्यांवरून थेट ४९ टक्क्यांवर पोहोचला. सर्वसाधारणपणे याच कालावधीत ब्राझीलमध्ये हीच वाढ १४ टक्क्यांरून ३१ टक्क्यांपर्यंत घडून आली. ग्रामीण परिसरातील पुरुष श्रमिकांना रोजगार पुरविण्यात बिगर शेती क्षेत्राची भूमिका, विशेषतः, पूर्व आणि आग्नेय आशियात कळीची ठरते. बिगर शेती क्षेत्रातील रोजगार संधींचे दरवाजे उघडले जाण्याचा एक परिणाम शेतीमध्ये गुंतलेल्या श्रमिकांच्या 'जेन्डर कॉम्पोझिशन'वरही जाणवतो. ग्रामीण भागांतील पुरुष रोजगारासाठी बिगर शेती उद्योगव्यवसायांकडे वळले की शेतीमधील त्यांचा उणावलेला सहभाग शेतकरी-कामकरी कुटुंबांतील महिला भरून काढतात. साहजिकच, शेतीमधील रोजगार हा अधिक महिलाप्रधान वा महिलाबहुल बनत जातो.

ग्रामीण भागांतील रोजगाराचे हे बदलते स्वरूप बघता बिगर शेती उद्योगव्यवसायांना चालना देणे हा देशोदेशीच्या ग्रामीण विकासविषयक धोरणांचा एक अग्रक्रम बनत आहे. ग्रामीण भागांतील बिगर शेती व्यवसाय व रोजगार संधीमध्ये विस्तार घडून येण्यासाठी या क्षेत्रांतील खासगी गुंतवणूक वाढण्याची आवश्यकता आता सर्वच स्तरांवर मुखर होऊ लागलेली आहे. खासगी गुंतवणूक ही नेहमीच सार्वजनिक वा सरकारी गुंतवणुकीचे बोट धरून चालते वा तिला अनुसरते, असा सिद्धांतवजा दाखला आहे. ग्रामीण बिगर शेती क्षेत्रांच्या विकासासाठी आवश्यक असणारा खासगी गुंतवणुकीचा डोस प्रत्यक्षात उतरण्यासाठी ग्रामीण भागांतील सार्वजनिक गुंतवणुकीचा प्रवाह जोमदार बनविण्याची आवश्यकता आता सर्वत्र प्रतिपादली जाऊ लागली आहे. सार्वजनिक गुंतवणूक ही मुख्यतः ग्रामीण भागांतील रस्ते, वीज, दळणवळण यांसारख्या पायाभूत सेवासुविधांमध्ये केली जावी, यांबाबत मतैक्य आहेच. परंत, त्याच्याच जोडीने सरकारी व खासगी प्रयत्नांचे सुसूत्रीकरण साधून शेतीमाल प्रक्रिया उद्योगांची संकुले ग्रामीण भागांत उभारण्याच्या पर्यायाचाही हिरीरीने पुरस्कार केला जात आहे. जगभर चाललेल्या या विचारमंथनातून आपण काही शिकणार की नाही ? ✿✿

# चीनचा व्यापारी ठसा

चीनचा जोमदार आणि सातत्यपूर्ण आर्थिक विकास हा अलीकडील काळात एक विलक्षण कुतूहलाचा, विस्मयाचा आणि त्याच वेळी धडकी भरविणारा विषय बनला आहे. विशेषत:, चालू शतक हे आशिया खंडाचे आहे, असे जेव्हा सांगितले जाते तेव्हाही त्यात अध्याहृत असते ती आशिया खंडासह एकंदरच जागतिक स्तरावर विस्तारणारी-प्रस्थापित होणारी चीनची आर्थिक महत्ता. चीनच्याच जोडीने आशिया खंडातील एक उभरती आर्थिक सत्ता म्हणून भारताचाही निर्देश केला जात असला तरी दबदबा जाणवतो तो चीनचाच. त्यातच, जागतिक व्यापार संघटनेचे सदस्यत्व चीनने स्वीकारल्यापासून तर वैश्विक व्यापाराचा एक वजनदार भागीदार म्हणून सक्रिय बनलेल्या चीनचा जागतिक बाजारपेठेतील ठसाही जाणवण्याइतपत ठसठशीत बनला आहे. अलीकडील काळात खनिज तेलाच्या जागतिक बाजारपेठेत तेलाचे भाव सातत्याने तापत आहेत. पोलादाची बाजारपेठही गरमच आहे. या दोन्ही जिनसांच्या बाजारपेठांमध्ये मागणीची तेजी धगधगती राहण्यास चीनकडून केली जाणारी या उभय चीजांची दमदार आयातच मोठ्या प्रमाणावर कारणभूत असल्याचे या क्षेत्रातील अभ्यासक-तज्ज्ञांचे निरीक्षण आहे.

चीनचा औद्योगिक उत्पादनाचा पाया चांगला विस्तृत असल्याने चिनी निर्यातीमुळे जागतिक बाजारपेठेतील वस्तूंच्या पुरवठ्यांचे प्रवाहही पालटत आहेत. चीनची ही औद्योगिक आगेकूच आणि तिच्या भरवशावर जागतिक व्यापारात चीनने निर्माण केलेले आपले अवकाश असेच उत्तरोत्तर सघन होत गेले तर जागतिक व्यापारावर त्याचे काय परिणाम संभवतात यांबाबत सध्या अभ्यास व संशोधन सुरू आहे. चीनच्याच बरोबरीने अथवा चीनच्या पाठोपाठ औद्योगिक गुंतवणूक, परकीय थेट गुंतवणूक, उत्पादनक्षमता यांचे केंद्रीकरण भारतातही होऊ लागले तर एकूण जागतिक व्यापाराचे, आयातनिर्यातीचे प्रवाह व त्या प्रवाहांच्या दिशा, चीन व भारत या उभयतांच्या स्पर्धक देशांचे व्यापार, आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील त्यांचे स्थान या साऱ्यावर याचे नेमके काय परिणाम संभवतात हा आता अधिक अभ्यासाचा विषय बनतो आहे. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील चीनचे वाढते प्रस्थ ध्यानात घेता, विविध वस्तू व सेवांच्या

पुरवठ्याचा जो जागतिक नकाशा आहे त्यावर चीनचे स्थान आगामी काळात कसे असेल, हा आता विशेष औत्सुक्याचा प्रांत बनतो आहे.

त्याला कारणही तसेच आहे. कारण, एकंदरच जागतिक व्यापार आणि बाजारपेठेतील चीनचा आजचा ठसा हा अनुल्लेखाने मारण्याइतपत नगण्य नक्कीच नाही. औद्योगिक उत्पादनांची जागतिक निर्यात बघितली तर आजमितीस चीनचा तिच्यातील वाटा जवळपास आठ टक्क्यांच्या परिघात आहे. चीनच्या औद्योगिक उत्पादनांच्या एकत्रित मूल्याशी या निर्यातीचे प्रमाण काढले तर ते जवळपास एक चतुर्थांश इतके भरते. यंत्रसामग्री आणि वाहन व वाहन उद्योगाशी निगडीत उत्पादने, उपकरणे, सुटे भाग यांचा चीनच्या निर्यातीतील हिस्सा चांगला ४५ टक्क्यांचा आहे. जगभरातील देश परस्परांकडून जी आयात करतात त्या अवघ्या जागतिक आयातीचा विचार केला तर तिच्यातील चिनी वाटाही जवळपास सहा-साडेसहा टक्क्यांचा आहे. हे सारे चीनला शक्य झाले आहे कारण मुळात चीनचा औद्योगिक पायाच त्याने चांगला भरभक्कम बनविलेला आहे. चिनी ठोकळ देशी उत्पादनाची जडणघडण बघितली तरी चीनच्या सुदृढ औद्योगिक प्रकृतीची कल्पना येते. चीनच्या देशांतर्गत ठोकळ उत्पादनात उद्योगक्षेत्राचा हिस्सा चांगला ४१ टक्के इतका बाळसेदार आहे.

जागतिक व्यापारात आणि बाजारपेठेत हा जो चिनी ठसा उमटलेला आहे त्याबाबत कुतूहल निर्माण व्हावे यात अनैसर्गिक असे काहीच नाही. कारण, जगभरातील विविध देशांना या चिनी ठशाच्या वाढत्या प्रभावाचे वेगवेगळे परिणाम निरनिराळ्या प्रकारे अनुभवास येत आहेत. संपूर्ण जागतिक वस्तुउत्पादनप्रक्रियेचे जणू केंद्रच असा चीनचा आज लौकिक बनतो आहे. उत्पादनाबरोबरच जागतिक निर्यातीमध्ये चीनने आपले जे स्थान निर्माण केले आहे त्याचा एक परिणाम असा झालेला आहे की उपभोगासाठी उपलब्ध असलेल्या जिनसांचे प्रमाण व वैविध्य यांत वाढ घडून आलेली आहे. चिनी उत्पादने ही स्पर्धात्मक किमतींना मिळत असल्याने चिनी उत्पादने आयात करणाऱ्या विकसित देशांमधील ग्राहक-नागरिकांच्या वास्तव उत्पन्नात वाढ घडून येण्यास चीन एक प्रकारे हातभार लावत आहे. यांबाबत आयातदार देशांमध्ये एकीकडे समाधान आहे. तर, उत्पादनक्षमता, भांडवल आणि औद्योगिक गुंतवणूक यांचे केंद्रीकरण चीनमध्ये होऊ घातल्याने 'आउटसोर्सिंग'च्या प्रक्रियेद्वारे रोजगारांचे स्थलांतरण सुरू झाल्याने आपल्या नोकऱ्यांवर गदा येत असल्याची दाहक जाणीवही आयातदार देशांमध्ये त्याच वेळी बळावत आहे.

निर्यातीइतकाच चीन आयातीबाबतही भरभक्कम आहे. मुळात चीनची अंतर्गत बाजारपेठही चांगलीच भरगच्च असल्याने चीनला निर्यात करणारे देश आपल्या उत्पादनांना एक चांगली मोठी आणि विस्तारक्षम बाजारपेठ खुली झाल्याचा आनंद एकीकडे उपभोगत असतात. तर, दुसरीकडे त्यांना चिंतेचा एक ढगही वेढत असतो. आज ना उद्या बाजारपेठेतील आपल्या स्थानावर चीन कुरघोडी करील, ही ती चिंता. ही चिंता या देशांना वाटणे हे स्वाभाविकच आहे. कारण, मुळात चीनची लोकसंख्या आणि पर्यायाने अंतर्गत बाजारपेठ चांगलीच घसघशीत असल्याने, कोणत्याही वस्तू अथवा सेवेचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर करण्याने उत्पादन खर्चात बचत साधण्याच्या ज्या संधी व शक्यता उपलब्ध होतात त्या चीनला सहजप्राप्यच आहेत. त्यामुळे, आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत आपली उत्पादने अत्यंत स्पर्धात्मक किंमतींना उतरविणे हे चीनला शक्य बनते. या क्षमतेच्या बळावर, आपण जी उत्पादने चीनप्रमाणेच अन्य देशांनाही विकतो त्या उत्पादनांच्या स्पर्धात्मक निर्मितीत एक ना एक दिवस चीन आघाडी घेईल आणि त्या जिनसांच्या जागतिक बाजारपेठेत आपल्यासमोर तीव्र स्पर्धेचे आव्हान उभे करील, हा गोळा चीनला वस्तू निर्यात करणाऱ्या स्पर्धक देशांच्या पोटात कायमच उठलेला असतो. वैश्विक बाजारपेठेतील एक समर्थ आयातनिर्यातदार देश या नात्याने आगामी काही दशकांत चीनची भूमिका व स्थान नेमके कसे असेल यांबाबत अभ्यासकांनी रेखाटलेली काही चित्रे मोठी मनोज्ञ आहेत.

एक आयातदार देश म्हणून जेव्हा आपण चीनकडे बघतो तेव्हा मुख्यत्वे अन्नधान्यासहित विविध प्रकारचा शेतमाल, औद्योगिक उपकरणे, भांडवली स्वरूपाची यंत्रसामग्री, सुटे भाग यांचा एक वजनदार खरेदीदार ही चीनची प्रतिमा आपल्यासमोर उभरते. जगभरातील विकसनशील देश आणि चीन यांच्यातील देवाणघेवाण अभ्यासली तर, औद्योगिक कच्चा माल व सुटे भाग आणि खनिज तेलासह ऊर्जासाधनांच्या आयातीसाठी चीन मुख्यतः विकसनशील देशांबरोबर व्यापारी भागीदारी करत असल्याचे ध्यानात येते. २००२ साली चीनने एकंदर ३५० कोटी डॉलर इतक्या रकमेची या जिनसांची आयात विकसनशील देशांकडून केली. चीनला या उत्पादनांचा पुरवठा करणाऱ्या निर्यातदार देशांच्या लेखी चिनी बाजारपेठ ही तिसऱ्या क्रमांकाची मोठी बाजारपेठ गणली जाते.

अन्नधान्य व अन्य शेतमालाच्याबाबतीत आजमितीस चीन जरी नक्त निर्यातदार म्हणून शेतमालाच्या जागतिक बाजारपेठेत सक्रिय असला तरी, भविष्यात चीनला

(खास करून) अन्नधान्याची आयात करावी लागेल, असे अभ्यासकांचे अनुमान आहे. देशांतर्गत अन्नधान्योत्पादनाचा विचार केला तर, उत्पादनाची सर्वोच्च पातळी अलीकडील काळात चीनने १९९६ आणि १९९८ या दोन वर्षांत गाठल्याचे दिसते. मात्र त्यानंतर धान्योत्पादनाला उतरती कळा लागल्याचा अनुभव आहे. परिणामी, आगामी भविष्यात अन्नधान्याच्या देशांतर्गत पुरवठ्यासाठी चीनला आयातीचा आसरा घ्यावा लागेल, असे मत या क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्त करतात.

भांडवली यंत्रसामग्री, औद्योगिक उपकरणे, सुटे भाग यांची चीन करीत असलेली आयात म्हणजे चिनी औद्योगिक विकासाची मोठी ऊर्जाच आहे. भांडवली स्वरूपाच्या यंत्रसामग्रीची आयात चीन करतो ती मुख्यतः अग्रगण्य विकसित देशांकडून. चीनचा औद्योगिक विकास, अत्याधुनिक तंत्रज्ञानाचे चीनला होणारे हस्तांतरण आणि महत्त्वाचे म्हणजे चिनी औद्योगिक क्षमतांचा विस्तार या तीनही गोष्टी साध्य करणे हे चीनला या आयातीद्वारे शक्य होते. या जिनसांची आयात आगामी दशकांत अशीच अव्याहत चालू राहील, अशीच सारी चिन्हे आज दिसतात. परंतु, या वस्तूंच्या देशांतर्गत उत्पादनाचे तांत्रिक कौशल्य आत्मसात करावयाचे, त्यांच्या निर्मिती प्रक्रियेत व्यापारी स्पर्धात्मकता हस्तगत करावयाची आणि मग याच उत्पादनांची निर्यात करण्यासाठी जागतिक बाजारपेठेत उतरावयाचे हा टप्पा गाठण्यास, आपल्या औद्योगिक क्षमतांचा विकास त्या पातळीपर्यंत घडवून आणण्यास चीनला अजून अवधी लागेल, असा विश्लेषकांचा दावा आहे.

इलेक्ट्रॉनिक उत्पादने व उपकरणांच्या वैश्विक बाजारपेठेत अग्रगण्य निर्यातदार म्हणून पूर्व व आग्नेय आशियाई देशांनी आजमितीस आपली मुद्रा उमटवलेली आहे. यांतील काही अर्थव्यवस्था या नवऔद्योगिक अर्थव्यवस्था म्हणून गणल्या जातात. चीन हा या नवऔद्योगिक अर्थव्यवस्थांचा एक प्रमुख व्यापारी मित्र व भागीदार गणला जातो. त्यातच, पूर्व आशियाई देशांतील उत्पादनांप्रती चीनने खुले व उदार आयात धोरण अंगिकारलेले आहे. या व्यापारी संबंधांच्या माध्यमातून चिनी अर्थव्यवस्था आणि पूर्व आशियाई देशांच्या अर्थव्यवस्था यांचे परस्परावलंबन आणि उभयतांची परस्परगुंफण अधिक गहिरी बनते आहे. त्यातच, जागतिक स्तरावरील उत्पादन साखळीतील महत्वाचे दुवे ठरणारे अनेक पूरक उद्योग व उपउत्पादनांचे निर्माते आपला 'प्रॉडक्शन बेस' चीनकडे सरकवत असल्याने जागतिक व्यापारातील चिनी ठसा आगामी काही दशके ठसठशीतपणे मिरवत राहील, असे मानण्यास जागा आहे. ✿✿

# दिग्गज तेल कंपन्यांना आव्हान

जागतिक राजकारणात व आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत तेलाचे महत्त्व गेल्या अनेक वर्षांपासून अधोरेखित झालेले आहे. तेलाच्या वाढत्या किंमती या देशोदेशींच्या अर्थव्यवहारांवर परिणाम करीत असतात त्याचप्रमाणे सर्वसामान्य नागरिकांच्या दैनंदिन जीवनावरही त्या प्रत्यक्षाप्रत्यक्षपणे प्रभाव टाकत असतात. त्यामुळे तेलविषयक घडामोडी जाणून घेणे उद्‌बोधक ठरते. तेलाच्या उत्पादनात एक्सॉन-मोबिल, शेल, शेव्हरॉन, ब्रिटिश पेट्रोलियम अशा दिग्गज कंपन्या आघाडीवर आहेत. यात Schlumberger या एका नवीन कंपनीचा प्रवेश झाला आहे. तसे पाहता ही कंपनी अनेक वर्षांपासून या दिग्गज कंपन्यांची सहकारी आहे. खरे तर या सर्व मोठ्या कंपन्या Schlumbergerच्या मदतीशिवाय तेलाचे उत्पादन करूच शकत नाहीत. कारण ही कंपनी तेलाच्या उत्पादनातील सर्व आवश्यक सेवा पुरविते. या कंपनीकडे उत्तम तंत्रज्ञान व तंत्रज्ञ आहेत. तेलाचे साठे जमिनीत कुठे व किती खोल आहेत हे शोधण्याचे काम Schlumberger करते. अशी माहिती संगणकावर साकारली की तेलाच्या विहिरी खणण्याचा आवाज त्या परिसरात घुमू लागतो. या बहुराष्ट्रीय कंपनीचे मुख्य कार्यालय पॅरिस आणि हूस्टन येथे आहे. या कंपनीचे सुमारे १४हजार कर्मचारी सध्या रशियातील तेलविहिरींसाठी काम करीत आहेत. Schlumbergerचे गेल्या वर्षीचे उत्पन्न किमान १.५ अब्ज अमेरिकी डॉलर इतके आहे. २००४च्या तुलनेत हे तिपटीने जास्त आहे. कंपनीच्या उत्पन्नातील किमान ३० टक्के वाटा हा रशियातील प्रकल्पांचा आहे. तेलाच्या उत्पादनासंदर्भात आता काही वेगळे बदल होण्याची शक्यता असून त्या बदलांना सामोरे जाऊन नफा मिळविण्याचे नियोजनबद्ध धोरण Schlumbergerने आखले आहे. हे बदल घडवून आणण्यात Schlumbergerच आघाडीवर आहे.

तेलाच्या क्षेत्रातील सर्व दिग्गज कंपन्यांच्या स्पर्धक असलेल्या सरकारी मालकीच्या कंपन्यांबरोबर अधिक सहकार्य करण्याचे Schlumbergerने ठरविले आहे. तसेच ज्या छोट्या कंपन्या या क्षेत्रात येऊ इच्छितात त्यांनाही मदत करण्यास Schlumberger उत्सुक आहे. साधारणतः तेलउत्पादक दिग्गज कंपन्या तेलाच्या साठ्यांवर आपला हक्क प्रस्थापित करतात आणि नफा मिळवितात; पण Schlumbergerने छोट्या

कंपन्यांबरोबर ठरावीक कालावधीचे करार करून आपण दिलेल्या सेवेचे शुल्क आकारण्याचे धोरण आखले आहे. या कंपनीचे काम मेक्सिको, सौदी अरेबियापासून सैबेरियापर्यंत कुठेही चालू असते. जगात कुठेही काम करण्यास तयार असलेल्या या कंपनीचे अनेक देशांबरोबर व अनेकानेक कंपन्यांबरोबर चांगले संबंध प्रस्थापित झाल्याने आघाडीवरील कंपन्यांसमोर एक आव्हान निर्माण झाले आहे. तेलाचे जुने साठे आटत चालल्याने नवनवीन साठे शोधण्यासाठी या मोठ्या कंपन्यांनी विकसनशील देशांकडे आपला मोहरा वळवला, पण विकसनशील देशांनी त्यांच्या बाजूने कल दर्शवलेला नाही. या देशांना असे वाटते की तेलाच्या साठ्यांवर आपल्या देशातील कंपन्यांचे नियंत्रण असावे व आवश्यक तेव्हाच परकीय कंपन्यांची मदत घ्यावी. या धोरणात कोणताही बदल न करता Schlumbergerच्या मदतीने त्यांना तेलाचे उत्पादन करता येऊ शकते. असे झाल्यास या मोठ्या कंपन्या अडचणीत येतील. म्हणून त्या काळजीत पडल्या आहेत.

अलीकडे आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत तेलाच्या किंमतीत सतत वाढ होते आहे. त्यामुळे विविध देशांमधील सरकारी कंपन्यांना दिग्गज कंपन्यांच्या भांडवलावर अवलंबून राहावे लागतेच असेही नाही. Saudi Armco, Mexico's Petroleos Mexicanos (Pemex), Gazprom, Rosneft या आणि जगभरातील इतरही काही कंपन्यांना आपल्या नफ्यात दिग्गज कंपन्यांचा वाटा असावा ( व पर्यायाने त्या देशाने आपल्यावर वर्चस्व गाजवावे) असे वाटत नाही आणि याचा फायदा Schlumbergerला होतो आहे. कारण ही कंपनी अमूक एखाद्या देशाची आहे, असा प्रकारच नाही. या कंपनीची नोंदणी झाली नेदरलँड्स् येथे. कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी - गोल्ड - राहतात पॅरिसमध्ये आणि कंपनीचे कामकाज चालते हूस्टन, पॅरिस व लंडन येथून. शिवाय ही कंपनी तंत्रज्ञानविषयक सेवा पुरविणारी असल्याने Schlumbergerचे मोठ्या कंपन्यांवाचून अडत नाही, मात्र मोठ्या कंपन्या तंत्रज्ञानासाठी पूर्णपणे Schlumbergerवर अवलंबून आहेत. आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे तेलाच्या किंमतीत चढउतार झाले तरी ही कंपनी आपला तंत्रज्ञानविषयक संशोधनाच्या खर्चात कपात करीत नाही, त्यामुळे त्यांचे तंत्रज्ञान नेहमीच अद्ययावत असते. तर दुसरीकडे दिग्गज कंपन्या अनेकदा आपल्या संशोधनखर्चात कपात करतात. त्यामुळे त्या तंत्रज्ञानविषयक संशोधनांत मागे पडतात. अद्याप, पहिल्या क्रमांकावर नसली तरी Schlumbergerने आघाडीवर असलेल्या दिग्गज कंपन्यांसमोर मोठे आव्हान उभे केले आहे, हे खरे. ✿✿

# 'अर्थबोधपत्रिके'चे अंतरंग (१ एप्रिल २००७ ते ३१ मार्च २००८)

'अर्थबोधपत्रिके'च्या सातव्या खंडातील हा पहिला अंक. 'पत्रिके'च्या सहावा खंडातील १२ अंकांचा आढावा या ठिकाणी सादर केला आहे. एक वार्षिक आन्हिक उरकावयाचे, एवढाच तांत्रिक हेतू यामागे अजिबातच नाही. ज्या हेतूने 'अर्थबोधपत्रिका' नामक हा उपक्रम १९९८ सालापासून अव्याहत सुरू आहे, त्या हेतूशी असणारी बांधिलकी पुन्हा एकवार तपासून बघण्याचा एक आरसा म्हणून हे सिंहावलोकन 'अर्थबोधपत्रिके'ची जडणघडण तसेच निर्मितीशी संबंधित असणाऱ्या सगळ्यांनाच उपयुक्त ठरते. केवळ उपयुक्तच नव्हे, तर मार्गदर्शकही !

**(१) प्रकाशित साहित्य** : अंकांतील लेख व पुरवणी लेखांसह एकूण ५६ लेख. 'जिकडे-तिकडे' या सदरांतर्गत स्फुटे - १०. अमेरिका, ब्रिटनसह आयर्लंड, जर्मनी, स्वीडन, फ्रान्स, जपान, ऑस्ट्रिया, तैवान, चीन, इराण, चेक रिपब्लिक, मलेशिया, थायलंड, पेरू आणि बोलिव्हिया, स्वित्झर्लंड, दक्षिण कोरिया, व्हिएतनाम, दक्षिण आफ्रिका, नायजेरिया, झांबिया, टांझानिया, घाना, अफगाणिस्तान, तुर्कस्तान, इजिप्त, ताजिकीस्तान, सौदी अरेबिया, बांगला देश, भारत यांसारख्या जगभरातील ३१ देशांमधून फेरफटका. **वाचकांनी पाठविलेल्या एकूण १० पत्रांना प्रसिद्धी.**

**(२) संदर्भ साहित्य** : देशी-विदेशी अशी एकंदर १५ नियतकालिके - नेचर, करन्ट हिस्टरि, इकॉनॉमिस्ट, फार ईस्टर्न इकॉनॉमिक रीव्ह्यू, जपान-एको, इकॉलॉजिस्ट, न्यू सायन्टिस्ट, न्यू स्टेटस्मन, मॅनेजमेन्ट टूडे, ॲप्रोप्रिएट टेक्नॉलॉजी, रिसर्जन्स, न्यूयॉर्कर, हार्वर्ड बिझनेस रीव्ह्यू, बिझनेस वीक, प्रॉस्पेक्ट -लेखनासाठी पायाभूत आधार साहित्य म्हणून. याशिवाय, इंटरनेटवरील एकंदर ४९ संकेतस्थळांवरून मिळवलेली माहिती. भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीमध्ये वेळोवेळी आयोजित केली जाणारी चर्चासत्रे, 'इकॉनॉमिक टाइम्स', 'हिंदू' यांसारखी दैनिके तसेच संस्थेच्या ग्रंथालयात उपलब्ध असणारे समृद्ध कोश वाङ्मय, विविध अभ्यास क्षेत्रांतील एकंदर २१ ग्रंथ, राष्ट्रीय जनगणना अहवाल, राष्ट्रीय नमुना पाहणी सर्वेक्षण अहवाल तसेच संयुक्त राष्ट्रसंघाने प्रकाशित केलेले विविध अहवाल यांद्वारा संकलित केलेल्या माहितीचाही लेखनास आधार.

# लेखांचे विषयवार वर्गीकरण

| अ.क्र. | विभाग | लेख संख्या | लेखगत विषय |
|---|---|---|---|
| १ | सामाजिक | ८ | •मूल्यविचार •विविध जातिसमूहांचे भौगोलिक स्थानांकन •शिक्षण व आरोग्यासारख्या नागरी सुविधांची उपलब्धता • अंमली पदार्थांची बाजारपेठ •युवकांचे विश्व • ज्येष्ठांच्या जगात |
| २ | औद्योगिक | ५ | •व्यापाराचे सहकारी 'मॉडेल' • औद्योगिक प्रशिक्षण • चैनीच्या वस्तूंची बाजारपेठ |
| ३ | आर्थिक | ८ | •स्थलांतरण • जागतिकीकरण आणि चलनवाढ •नगरसंस्थांचा जमाखर्च • विशेष आर्थिक क्षेत्रे •हेज् फंड • लघुवित्त चळवळ • भारतीय बाजारपेठ |
| ४ | विज्ञान/ संशोधन | २ | •चीनमधील विज्ञान •'बायोनिक मॅन' |
| ५ | तंत्रज्ञान | २ | •भारतातील दूरसंचार •'ग्लोबल वॉर्मिंग' व शेती |
| ६ | पर्यावरण | ९ | •'ग्लोबल वॉर्मिंग'चा इतिहास • परिसंस्था •पर्यावरणाचे राजकारण •उत्तर ध्रुवावरील बदल • पर्यावरण आणि गरिबी •पर्यावरण व व्यापार • चिनी प्रदूषण •'ग्लोबल वॉर्मिंग'चे पाच धोके |
| ७ | सांस्कृतिक | ७ | •कलेचे अर्थकारण • उत्सव सुगीचा |
| ८ | नागरीकरण | ४ | •जगभरातील नागरीकरण •शहरांची निर्मिती • स्थलांतरण •शहरांचा विस्तार |

## लेखांचे विषयवार वर्गीकरण

| अ.क्र. | विभाग | लेख संख्या | लेखगत विषय |
|---|---|---|---|
| ९ | राजकीय | ४ | •पंचायत राज्य आणि विकेंद्रीकरण •इराणमधील 'मखमली क्रांती' •ताजिकीस्तानातील पेच • टर्कीचे स्वप्न |
| १० | आरोग्य | १ | •ग्रामीण भारतातील सार्वजनिक आरोग्यव्यवस्था |
| ११ | धर्मविचार | २ | • साम्यवाद आणि धर्म • धार्मिक साहित्याची बाजारपेठ |
| १२ | शिक्षण | २ | •शिक्षणाची गुणवत्ता • 'बुनियादी' शिक्षण |
| १३ | पुरवणी | २ | •सरकारप्रायोजित संशोधन आणि सार्वजनिक कल्याण • भारतीय अर्थव्यवस्थेचे लॉर्ड मेघनाद देसाईकृत परिशीलन |

**(३) विशेषांक (एकूण ५)** : प्रत्येक कॅलेंडर वर्षाच्या १ एप्रिलपासून 'अर्थबोधपत्रिके'चा नवीन खंड सुरू होतो. मानवी मेंदूसंदर्भात जगभर चालू असलेल्या आधुनिक संशोधनाचा आलेख सांगोपांग सादर करणारा 'अर्थबोधपत्रिके'चा मेंदू संशोधन विशेषांक २००५ साली आला. २००५ सालातील फेब्रुवारी आणि मार्च अशा दोन महिन्यांचा तो एकत्रित जोड अंक होता. या अंकाला वाचकांचा उत्तम प्रतिसाद लाभला. हा प्रतिसाद ध्यानात घेऊनच भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीने यथावकाश मेंदू संशोधनावरील देखणा ग्रंथ प्रकाशित केला. त्या नंतर, २००५-०६ आणि २००६-०७ या दोन वर्षांत 'अर्थबोधपत्रिके'चा एकही विशेषांक आला नाही. तो 'बॅकलॉग' भरून काढण्याचा प्रयत्न २००७-०८ या वर्षात करण्यात आला. 'अर्थबोधपत्रिके'चे २००७ सालातील मे, जुलै, सप्टेंबर, नोव्हेंबर हे चार अंक आणि २००८ सालातील मार्च महिन्याचा अंक

असे एकंदर पाच अंक हे विशेषांक या स्वरूपाचे होते. मे महिन्याचा विशेषांक हा 'पर्यावरण' या विषयाला वाहिलेला होता. १५ ऑगस्ट २००७ रोजी भारतीय स्वातंत्र्याचा हीरक महोत्सव आपण साजरा केला. त्याप्रीत्यर्थ, देशाच्या ग्रामीण तसेच शहरी भागांतील पायाभूत सेवासुविधांच्या विकास-विस्ताराचा लेखाजोखा मांडणारा मजकूर जुलै २००७च्या अंकात सादर केला होता. एका परीने त्यास 'भारत-दर्शन विशेषांक' असे संबोधणे अनुचित ठरणार नाही. २००७ सालातील सप्टेंबर आणि नोव्हेंबर महिन्याचे अंक हे अनुक्रमे 'शहरी विश्व विशेषांक' आणि 'समृद्धी विशेषांक' म्हणून सादर केले गेले. तर, दर वर्षीचा १५ मार्च हा दिवस जगभरच जागतिक ग्राहक दिन म्हणून साजरा केला जातो, ही बाब ध्यानात घेऊन २००८ सालातील मार्च महिन्याचा 'अर्थबोधपत्रिके'चा अंक हा 'ग्राहक दिन विशेष अंक' या स्वरूपात वाचकांसमोर ठेवण्यात आला. या पाचही अंकांना 'विशेषांक' असे संबोधणे सार्थ ठरते कारण या अंकांची सर्वच्या सर्व पाने त्या त्या विषयाच्याच उहापोहासाठी खर्ची घातलेली होती. या पाचांपैकी मे २००७चा अंक वगळला तर, उर्वरित चार अंकांमध्ये 'जिकडे-तिकडे' हे सदरही देण्यात आले नव्हते. मे २००७मधील 'पर्यावरण विशेषांका'त जिकडे-तिकडे हे सदर होते, मात्र त्यातील मजकूरही पर्यावरणासंबंधितच होता.

मराठी भाषेतील ग्रंथ तसेच वाचनव्यवहारात अलीकडील काळात उत्साहवर्धक बदल होत असल्याचे बोलले-लिहिले जाते. साहित्य संमेलनांसारख्या साहित्यिक उपक्रमांना जोडून जी ग्रंथप्रदर्शने भरविली जातात त्यांना रसिकांचा लाभणारा उदंड प्रतिसाद, अशा संमेलनांमधून होणारी तडाखेबंद ग्रंथविक्री यांचे रोचक वृत्तांत आपण सारेच वाचत असतो. मोठमोठ्या शहरांमध्ये दिवाळी वा मे महिन्याच्या सुट्यांचा मोसम साधून आयोजित केली जाणारी ग्रंथप्रदर्शनेही चांगल्यापैकी गर्दी खेचत असतात. खास करून, आरोग्य व 'फिटनेस', अध्यात्म, योगोपचार, आहारशास्त्र व स्वयंपाककला, गुंतवणूक, पर्यटन यांसारख्या विषयांना वाहिलेल्या पुस्तकांना वाचकांच्या विविध स्तरांमधून चांगली मागणी असल्याचे, या संमेलनांमधून होणाऱ्या ग्रंथविक्रीचा अभ्यास असणाऱ्यांच्या बोलण्या-लिहिण्यातून कळते. अशा सगळ्या वातावरणात, प्रामुख्याने गंभीर विषयांची चर्चा करणारे, विचारचक्रास खाद्य पुरविणारे वाचनसाहित्य पुरविणारे, आणि त्याच वेळी चकचकीत बहिरंग, गुळगुळीत कागद, रंगीबेरंगी छायाचित्रे असा काहीही छानछौक नसलेले 'अर्थबोधपत्रिके'सारखे एक प्रकाशन वाचकांच्या वाचनानंदात आपल्या परीने भर घालते आहे, हीच आमच्या लेखी आश्वासक बाब आहे. ✿✿

# प्रमुख संदर्भ

**(A) Books-** (1) The Oxford Encyclopedia of the Modern Islamic World, Volume 2, John L. Esposito (Editor in Chief), Oxford University Press, New York, 1995 pp 196-202 (2) Dancing With Giants- China, India and The Global Economy, Edited by L.Alan Winters and Shahid Yusuf, The World Bank and The Institute of Policy Studies, Washington D.C., 2007 (3) World Development Report - 2008: Agriculture for Development, The World Bank, Washington D.C., 2007.

**(B) Magazines** - (1)Current History - December 2007 (2) The Economist - 12 January 2008 (3) BusinessWeek - 14 January 2008

**(C) Websites** - (1) news.bbc.co.uk (2) newton.uor.edu (3) iht.com (4) routledge.com (5)asiamedia.ucla.edu (6) islamabout.com (7)nytimes.com (8)countrystudies.us (9)rspas.anu.edu.au (10)pbs.org (11)economist.com (12)seasite.niu.edu

## भेट अंक योजना

'अर्थबोधपत्रिका' या उपक्रमात सहभागी झाल्याबद्दल आपले आभार. यात आपल्यासारख्या अनेकांचा सहभाग वाढावा, यासाठी आम्ही आपल्याकडून एक छोटी मदत मागत आहोत. 'अर्थबोधपत्रिका' आपल्यासारख्याच आणखी काही उत्सुक व्यक्तींपर्यंत पोचण्यासाठी आपणास विनंती अशी की, आपण आपल्या परिचयातील वाचनोत्सुक अशा व्यक्तींची नावे व पत्ते आम्हाला लेखी कळवावीत. म्हणजे आम्ही त्यांना एक 'भेट अंक' पाठवू. अंक आवडल्यास त्यांना 'पत्रिके'चे वाचक बनण्याबरोबरच संस्थेच्या समृद्ध ग्रंथालयाचाही लाभ घेता येईल.

### 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांसाठी वाचनसंधी

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी या संस्थेच्या संदर्भ ग्रंथालयात सामाजिक, आर्थिक, राजकीय व अन्य विषयांवरील सुमारे बारा हजारांवर उत्तमोत्तम ग्रंथ आहेत. केवळ इतकेच नाही तर, इकॉनॉमिस्ट, डाउन टू अर्थ, करंट सायन्स, इकॉनॉमिक ॲन्ड पोलिटिकल वीकली यांसारख्या विख्यात नियतकालिकांचे गेल्या अनेक वर्षांचे अंकही संग्रहात आहेत. 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांना या संदर्भ ग्रंथालयाचा लाभ विनामूल्य घेता येईल. या वाचनसंधीबाबत अधिक तपशीलासाठी व्यवस्थापकांकडे चौकशी करावी.

## भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीचे नवे प्रकाशन

आपल्या दैनंदिन जीवनावर प्रभाव पाडणाऱ्या क्रांतिकारी मेंदूसंशोधनावरील आकर्षक, सचित्र व संग्राह्य ग्रंथ

# कर्ता-करविता

### आधुनिक मेंदूसंशोधन व आपले जीवन

**मराठी भाषेला अभिमान वाटावा असे पुस्तक - डॉ. ह. वि. सरदेसाई**

● मेंदूसंशोधन ही एक क्रांतीच! मानवी जीवनाला अधिक उच्च टप्प्यावर नेणारी ऐतिहासिक घटना! या क्रांतीचा आलेख रेखाटणारा ग्रंथ.

पृष्ठे २४२ किंमत ३५०/-रुपये

**ग्रंथ घेणाऱ्यांना अर्थबोधपत्रिका मासिक एक वर्ष विनामूल्य**

## अर्थबोधपत्रिका वर्गणीदारांसाठी विशेष योजना

(१ जून २००६ पासून)

| | |
|---|---|
| वार्षिक वर्गणी | फक्त १०० / - रुपये |
| द्वैवार्षिक वर्गणी | फक्त १८० / - रुपये व 'अर्थबोधपत्रिके'चा मेंदूसंशोधन विशेषांक भेट |
| त्रैवार्षिक वर्गणी | फक्त २६० / - रुपये व एक पुस्तिका भेट |
| पंचवार्षिक वर्गणी | फक्त ४०० /- रुपये व दोन पुस्तिका भेट |

**पुस्तिका -** (१) भारतातील लोकसंख्यावाढीचा प्रश्न : लेखिका - कुमुदिनी दांडेकर (किंमत ३०/-रुपये) (२) सक्तीचे प्राथमिक शिक्षण : (इंग्रजी व मराठी) लेखक - जयकुमार अनगोळ (दोन्हीची किंमत ३०/-रुपये प्रत्येकी) (४) शोध घेते ते शिक्षण : लेखक - प्रा. रमेश पानसे (किंमत -५०/-रुपये) (५) मेंदूसंशोधन विशेषांक ( किंमत ४०/-रुपये)

# ग्रंथालयातील नवी पुस्तके

■India After Gandhi - The History of the World's Largest Democracy, by Guha, Ramchandra, Picador, London, 2007, Price -Rs.695/-

■Reassement of Marxism - Bokare (Dr.), M.G., Dr. M.G. Bokare Memorial Foundation Pune, August 2006, Price Rs. 150/-

■Let the Fittest Survive, Bokare (Dr.), M.G., Dr. M.G. Bokare Memorial Foundation Pune, August 2007, Price Rs. 200/-

■Economic Studies in Indigenous and Traditional Knowledge, Sengupta, Nirmal (Ed), Academic Foundation, New Delhi, 2007, Price Rs. 595/-

■Governance and Accountability - Essays on the Indian Financial and Corporate Sectors, by Ghosh, D.N., Oxford University Press, New Delhi, 2007, Price Rs. 595/-

■India Remembered, by Mountbatten, Pamela, Pavilion Books, Roli Books, London, 2007, Price Rs. 1495/-

■The Anti-dumping Agreement and Developing Countries - An Introduction, by Aggarwal Aradhana, Oxford University Press, New Delhi, 2007, Price Rs 595/-

■Great Speeches of Modern India, Mukherjee Rudranshu (Ed.), Random House India, New Delhi, 2007, Price Rs. 395/-

■Human Rights in Retreat, Sawant P.B. (Justice), Society for Comunity Organisation Trust, Madurai, Tamil Nadu, August 2005, Price Rs. 50/-

■Rural Banking and Poverty Alleviation, Roy Bhaktapada Sinha, Abhijit Publications, New Delhi, 2007, Price Rs. 450/-

■India's Unending Journey - Finding Balance in a Time of Change, Tully Mark, Rider Publishing, London, 2007, Price 695/

■H. Bredey's Commentary on Land Acquisition Act, 1894 (Act No. 1 of 1894) Volume 1 - Section 1 to 22, Revised by : Gupta (Dr.) Rajesh and Rekhi Gunjan, Delhi Law House, New Delhi, 2007, 9th Edition, Rs 1995/- for both the Volumes.

■H. Bredey's Commentary on Land Acquisition Act, 1894 (Act No. 1 of 1894) Volume 2 - Section 23 to 55, Revised by : Gupta (Dr.) Rajesh and Rekhi Gunjan, Delhi Law House, New Delhi, 2007, 9th Edition ■■

RNI Regn.No. MAHMAR/2002/9806
Postal Regn.No.: L-2/RNP/PNW/M 125/2007-2009
Licensed to Post Without Prepayment, LICENCE NO. LWP-228
Posted at Market Yard P.S.O. on 10th of each month

# भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

**स्थापना** ■ 'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी' ही संस्था प्रसिध्द अर्थतज्ज्ञ वि. म. दांडेकर यांनी १९७० साली स्थापन केली.

**उद्दिष्टे** ■भारताच्या सामाजिक, राजकीय, व आर्थिक समस्यांचा अभ्यास व संशोधन करणे. ■अभ्यासक, संशोधक, सामाजिक व राजकीय कार्यकर्ते, शासनकर्ते, उद्योजक, उद्योग -व्यवसायातील वरिष्ठ अधिकारी व सामान्य जनता यांना वरील विषयांचे ज्ञान व माहिती देणे. ■इंग्रजी व इतर भारतीय भाषांमध्ये संदर्भित विषयांवरील साहित्य/पत्रके/ पुस्तिका प्रकाशित करणे.

**उपक्रम** ■संस्थेतर्फे १९८९ सालापासून, भारताच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय विचारांना वाहिलेले एक इंग्रजी त्रैमासिक('जर्नल ऑफ इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी') चालवले जाते.

■संस्थेतर्फे वेळोवेळी, विविध विषयांवर अभ्यासशिबिरे, कार्यशाळा, चर्चासत्रे, गटचर्चा यांसारखे कार्यक्रम आयोजित केले जातात.

■अलीकडे, संस्थेतर्फे सर्वसामान्य माहिती विभिन्न वाचकांना देणाऱ्या, वेगवेगळ्या विषयांवरील छोट्या पुस्तिका तयार करून वितरित करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

## - संस्थेचे नियंत्रण मंडळ -

•अजित कर्णिक •विकास चित्रे •अभय टिळक •कुमुदिनी दांडेकर
•ललित देशपांडे •द.ना. धनागरे •आनंद नाडकर्णी
•सुहास पळशीकर •रमेश पानसे •मनोहर भिडे •योगेंद्र यादव •नीळकंठ रथ
•व्ही.एम्.राव •ए.वैद्यनाथन •रामदास होनावर

**इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी (भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी) पुणे या संस्थेच्या मालकीचे हे मासिक, मुद्रक व प्रकाशक रामदास होनावर यांनी एस. के. प्रिंटर्स, परज अपार्टमेंट, २०५ शनिवार पेठ, पुणे - ४११०३० येथे छापून 'अर्थबोध', ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, पुणे - ४११०१६ येथून प्रकाशित केले. संपादक : अभय टिळक**